RNI : MAHMAR/2022/88796
www.vidarbhkesari.com Vidabh Kesari News 90969 45629 @vidarbhkesari
vidarbhkesari21@gmail.com

दैनिक
# विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू
मुख्य संपादक : अमोल कंटाळे
www.vidarbhkesari.com

अमरावती
२४ शनिवार जानेवारी २०२६
✻ वर्ष ५ ✻ अंक २३९
✻ पृष्ठ : ४ ✻ मूल्य रु : ३

## आता धरणांच्या पाण्यावर तयार होणार वीज!

■ राज्यातील सिंचन प्रकल्प आणि धरणांच्या जलाशयांचा वापर आता हरित ऊर्जा निर्मितीसाठी केला जाणार आहे. जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी ही माहिती दिली. कृष्णा आणि गोदावरी खोरे विकास महामंडळांतर्गत येणाऱ्या धरणांवर मोठ्या प्रमाणावर तरंगते सौर प्रकल्प (फ्लोटिंग सोलर) उभारून महाराष्ट्राला हरित ऊर्जेत आघाडीवर आणण्याचा विभागाचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

## बिबट्याने केली वासराची शिकार

▸विदर्भ केसरी। अमरावती :

अंजनगाव सुर्जी तालुक्यातील हिरापूर परिसरात बिबट्याचा वावर कमालीचा वाढला असून वन्यप्राण्यांच्या हल्ल्याचे सत्र सुरूच आहे. हिरापूर येथील गौरखेड शिवारात बिबट्याने थेट शेतातील गोठ्यात शिरून एका गायीच्या वासराची शिकार केल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे परिसरात चांगलीच खळबळ उडाली असून जीव मुठीत धरून शेतीकामे करणाऱ्या शेतकरी आणि शेतमजुरांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. मिळालेल्या माहितीनुसार हिरापूर येथील शेतकरी विनोद इश्वरकर यांचे गौरखेड शिवारात गट क्रमांक ३४ मध्ये शेत आहे. रात्रीच्या सुमारास त्यांच्या शेतातील गोठ्यात गुरे बांधलेली असताना, दबा धरून बसलेल्या बिबट्याने गायीच्या वासरांवर अचानक हल्ला चढवला. यात वासराचा जागीच मृत्यू झाला. सकाळी इश्वरकर हे शेतात पोहचले असता, त्यांना वासरू मृतावस्थेत आढळले. वासराच्या शरीरावरील जखमांच्या खुणांवरून हा हल्ला बिबट्यानेच केल्याचे स्पष्ट झाले आहे. गेल्या काही दिवसांपासून हिरापूर आणि लगतच्या परिसरात बिबट्याचा मुक्त संचार सुरू आहे. रात्री सोडाच, पण दिवसाही बिबट्याचे दर्शन होत असल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. सध्या शेतीकामे ऐन बहरात असताना वन्यप्राण्यांच्या दहशतीमुळे मजूर शेतात येण्यास टाळाटाळ करीत आहेत. यामुळे शेतीचे आर्थिक नुकसान होण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे.

## पालकमंत्री बेपत्ता! शोधून काढणाऱ्याला बक्षीस आणि होणार सत्कार

▸विदर्भ केसरी। भंडारा

: लोकसभा, विधानसभेच्या निवडणुका पार पडल्या. मात्र निवडून आलेले लोकप्रतिनिधी त्यांच्या मतदारसंघाकडे आता ढुंकूनही पाहत नाहीत. निवडणुकीत केलेल्या विकासाच्या बाता आता हवेत विरल्या आहेत. विशेष म्हणजे ज्यांनी जिल्ह्याचे पालकत्व स्वीकारले आहे असे पालकमंत्री देखील भंडाऱ्याला पर्यटन स्थळ समजून केवळ भेट देऊन जातात. त्यामुळे सर्वच मतदारसंघांचा विकास रखडलेला आहे. प्रशासन, लोकप्रतिनिधी, पालकमंत्री यांच्या या उदासीन धोरणाच्या विरोधात आता संतप्त नागरिकांनी आंदोलन पुकारले आहे. जिल्ह्यातील लाखनी तालुक्यातील कवलेवाडा ग्रामपंचायतीने पालकमंत्री पंकज भोयर व आमदार, खासदार यांचा बेपत्ता असल्याचे फलक लावले जो कोणी त्यांना शोधून देईल त्यांना योग्य ते बक्षीस देऊन त्यांचा

# बाळासाहेब ठाकरे आज नाहीत तेच बरंय

## महाराष्ट्राची आजची परिस्थिती बघून व्यथित झाले असते- राज ठाकरे; आठवणींना दिला उजाळा

▸विदर्भ केसरी।



शिवसेना संस्थापक पक्षप्रमुख हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दीनिमित्ताने श्री षण्मुखानंद सभागृहात शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे पुन्हा एकदा एकाच मंचावर आले आहेत. विशेष म्हणजे कल्याण-डोंबिवलीत मनसेने शिवसेना शिंदे गटाला पाठिंबा दिल्यानंतर उभय नेते पहिल्यांदाच एकत्र आले. दरम्यान, कार्यक्रमाच्या सुरुवातीला पोवाडाच्या माध्यमातून महाराष्ट्रातली परिस्थिती तसेच शिवसेना पक्षात घडलेल्या घडामोडींवर भाष्य करत शिंदे गट तसेच भाजपवर टीका करण्यात आली.

मनसे प्रमुख राज ठाकरे यावेळी म्हणाले, माझ्या जमलेल्या सर्व हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे प्रेमींचे मी स्वागत करतो. मला फार सर्दी झाली आहे, त्यामुळे शब्दांवरचे अनुस्वार गेले आहेत. मागे उद्धव आजारी होते तेव्हा माझ्या फॅमिली डॉक्टरांकडून मी औषधं दिली. आता मी त्यांच्याकडून औषध घेत आहे, सहा दिवस झाले अजून बरा नाही. मग मी उद्धवला फोन करून विचारले, माझ्या डॉक्टरांनी पक्ष बदलला की काय, असे म्हणताच एकच हशा पिकला.

पुढे बोलताना राज ठाकरे म्हणाले, आज बाळासाहेबांचे जन्मशताब्दी वर्ष सुरू होत आहे. आज सामनामध्ये मी लेख लिहिला आहे, त्यात अनेक आठवणी मी लिहिल्या आहेत. खरे तर त्या व्यक्तीला कसे मांडायचे हे अनेकदा प्रश्न माझ्यासमोर उभे राहतात, काका म्हणून मांडायचे, व्यंगचित्रकार म्हणून मांडायचे की काय.. त्यांचे अनेक किस्से हे न सांगण्यासारखे आहेत. तुम्हाला माहीत नाही काय होते ते, तुम्हाला फक्त भाषणातून झलक दिसली आहे.

पुढे राज ठाकरे यांनी एक प्रसंग सांगितला, बाळासाहेब कलानगरमध्ये फेऱ्या मारायचे, ही गोष्ट आहे 94-95 ची असेल. तेव्हा बाळासाहेब प्रमोद महाजन यांना असे म्हणाले होते की, प्रमोद मी देशातील हिंदूंना मी हिंदू म्हणून मतदान करायला लावेल आणि हिंदू मतदार तयार होतील. प्रमोद महाजन म्हणाले, हे शक्य नाही या देशात. यावर बाळासाहेब म्हणाले तू मला ओळखत नाहीस आणि बाळासाहेबांनी या देशात हिंदूंना हिंदू शक्ती बनू शकते हे दाखवून दिले. भाजपला तर कल्पना पण नव्हती. त्यावेळेला वातावरण सुद्धा वेगळे होते. आज बाळासाहेब असते आणि हिंदुत्वाचा बाजार पाहिला असता, तर निश्चित व्यथित झाले असते. मी काय सांगितले होते आणि तुम्ही काय करून ठेवले? असा प्रश्न त्यांनी विचारला असता. त्यांनी ज्या तडफेने जे विचार मानले, हिंदूंना हिंदू म्हणून जागे केले, मराठीला मराठी म्हणून जागे केले. हे आपण असेच जागे ठेऊ, असे आवाहन राज ठाकरे यांनी यावेळी केले.

### सकाळी गेल्यावर साफ झालेली बरी..

■ मी जेव्हा बाहेर पडलो, त्या वेदना वेगळ्या होत्या. माझ्यासाठी पक्ष सोडणे नव्हते, माझ्यासाठी घर सोडणे होते. या सगळ्याला 20 वर्षांचा काळ उलटून गेला आहे. अनेक गोष्टी आम्हाला उमगल्या आहेत. द्या सोडून ते आता. काय सकाळी गेल्यावर साफ झालेली बरी असते, कुठे आयुष्यभर कुंथत बसायचे? असा प्रश्न विचारात खट्याळ जोक यावेळ राज ठाकरेंनी मारला.

■ राज ठाकरे म्हणाले, बाळासाहेब ठाकरे यांच्यावर मला व्याख्यान द्यायला आवडेल. त्यांच्या सगळ्या पैलू मला उलगडायला आवडेल. बाळासाहेब ठाकरे कसा होता हे जगाला कळलेच नाही. आम्ही घरातले असून आम्हाला कळले नाहीत, तुम्हाला कुठून कळणार? असे राज ठाकरे म्हणाले. त्यानंतर राज ठाकरे यांनी केले ट्विट वाचून दाखवले.

### बाळासाहेब व्यंगचित्र काढताना समाधी असायची

■ राज ठाकरे म्हणाले, मी लहान असतानापासून त्यांना पाहत आलो आहे. बाहेर सगळं भयानक वातावरण सुरू असताना, हे जेव्हा व्यंगचित्र काढायला बसायचे, तेव्हा त्यात मला कधीच मारकाम नाही दिसले. ती समाधी लागणे म्हणतात. ते व्यंगचित्र नसून समाधी असायची. तेंडुलकरांचे एक फार छान पुस्तक आहे, 'हे सगळे येते कुठून', असे ते व्यक्तिमत्व आहे. देशातील सगळ्या राजकारण्यांपासून ते वेगळे होते, त्याचे कारणच ते असायचे.

### बाळासाहेब आज नाहीत तेच बरे

■ पुढे बोलताना राज ठाकरे म्हणाले, आज महाराष्ट्राची जी परिस्थिती झाली आहे म्हणजे गुलामांचा बाजार. आजची परिस्थिती बघून मला असे वाटत आहे की बाळासाहेब आज नाहीत तेच बरे आहे. काय त्रास झाला असता त्या माणसाला. कुठे नेतोय आपण? आज ही परिस्थिती बघायला बाळासाहेब नाहीत यापेक्षा चांगली गोष्ट नाही. ज्या गोष्टी शून्यातून उभ्या केल्या. बाहेरच्या पक्षात बघा, अनेक लोक दिसतील की जे बाळासाहेबांनीच निर्माण केली होती.

# अनैतिक संबंधांतून तरुणाची हत्या

▸विदर्भ केसरी।

सातारा जिल्ह्यातील फलटण तालुक्यातील सोमंथळी येथून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. अनैतिक संबंधांच्या अडथळ्यातून एका 27 वर्षीय तरुणाची दगडाने ठेचून हत्या करण्यात आली आहे. इतकेच नव्हे तर हत्येचा पुरावा नष्ट करण्यासाठी आरोपींनी मृतदेहाचे लाकूड कापण्याच्या मशीनने तुकडे करून ते नदी आणि शेततळ्यात फेकून दिल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. सतीश उर्फ आप्पा दादासो दडस असं हत्या झालेल्या दुर्दैवी तरुणाचं नाव आहे.

फलटणमधील या घटनेबाबत मिळालेली माहिती अशी की, या प्रकरणातील मयत व्यक्तीची हरवल्याची तक्रार फलटण ग्रामीण पोलीस ठाण्यात दाखल झाली होती. त्यानंतर पोलिसांनी तपासाची चक्र फिरवत अवघ्या चार तासात हा खुनाचा गुन्हा उघडकीस आणला आहे. या प्रकरणातील आरोपींना अटक करण्यात आली असून पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे. या घटनेबाबत समोर आलेली माहिती अशी की, दोन व्यक्तींसोबत संबंधित महिलेचे अनैतिक संबंध होते. यातील पहिल्या प्रियकराचा खून करण्याच्या उद्देशाने पती आणि प्रियकराला सोबत घेऊन संबंधित महिलेने दुसऱ्या प्रियकरचा खून केला आहे. या घटनेची महिलेनी कबुली दिली आहे. या क्रूर हत्याकांडाने संपूर्ण सातारा जिल्हा हादरून गेला आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार, मृत सतीश दडस या तरुणाचे आरोपी महिलेशी अनैतिक संबंध होते. याच महिलेचे आणखी एका तरुणाशी अफेयर होते. सतिश या महिलेला ब्लॅकमेल करत असल्याती माहिती समोर आली आहे. त्यामुळे ती वैतागली होती. 14 जानेवारी अनैतिक संबंधातून मृत तरुणाचा आरोपी महिला, तिचा पती आणि प्रियकरासोबत वाद झाला. यावेळी सतीश दडस याला लोखंडी रॉडने मारहाण करण्यात आली.

# सत्तेची फळे चाखण्यासाठीच भाजप-एमआयएम युती!

## ⏭ काँग्रेसच्या नगरसेवकांचा आरोप

▸विदर्भ केसरी। अमरावती :

सत्तेची फळे चाखण्यासाठीच अचलपूर नगरपालिकेत काँग्रेसला बाजूला सारून भाजपने एमआयएम सोबत युती केली. विषय समित्यांच्या सभापतीपदांच्या निवडीच्या वेळी ज्या पद्धतीने भाजपच्या गटाने एमआयएमचा समावेश असलेल्या गटाच्या उमेदवारांना सूचक आणि अनुमोदन दिले, त्यावरून ही युती झाल्याचे स्पष्ट झाले आहे, असा आरोप अचलपूर येथील काँग्रेसच्या नगरसेवकांनी पत्रकार परिषदेतून केला.

अचलपूर नगरपालिकेच्या उपाध्यक्षपदासाठी निवडणूक झाली, तेव्हा काँग्रेसच्या १५ नगरसेवकांच्या गटाला नगर विकास आघाडीने पाठिंबा दिला होता. यात एमआयएमचे ३, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे २ आणि ३ अपक्ष अशा ८ सदस्यांचा समावेश आहे. विषय समित्याच्या सभापतीपदाच्या निवडीच्या वेळी हा गट काँग्रेससोबत राहील, अशी आमची अपेक्षा होती, पण अचानकपणे घडामोडी घडल्या आणि नगरविकास आघाडीने भाजपला सहकार्य करण्याची भूमिका घेतली. हा आमच्यासोबत विश्वासघात ठरला, असा आरोप काँग्रेसच्या नगरसेवकांनी केला.

अचलपूर नगरपालिकेत चार गट अस्तित्वात आहेत. त्यात काँग्रेसच्या १५, भाजपचे ९ आणि १ अपक्ष मिळून १०, नगरविकास आघाडीत एमआयएमचे ३, अपक्ष ३ आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे २ असे ८ तसेच अपक्षांच्या शहर विकास आघाडीचे ८ सदस्य असे बलाबल आहे. काँग्रेसकडे नगर विकास आघाडीच्या पाठिंब्याने २३ इतके बहुमत होते. ते उपाध्यक्षपदाच्या निवडीच्या वेळी दिसले. पण, नगर विकास आघाडीने काँग्रेसचा विश्वासघात करून भाजपला साथ देण्याचा निर्णय घेतला. आमच्याकडे पुरेसे संख्याबळ नसल्याने आम्ही हतबल झालो होतो, असे काँग्रेसच्या नगरसेवकांनी सांगितले. यावेळी त्यांनी भाजपच्या गटाने नगरविकास आघाडीच्या उमेदवारांना दिलेल्या सूचक आणि अनुमोदनाची कागदोपत्री नोंद दाखवली.

# चाकूने वार करून तरुणाचा खून

▸विदर्भ केसरी। नागपूर :




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे गृह शहर असलेल्या नागपुरात श्रीराम मंदिर प्राणप्रतिष्ठा महोत्सवाच्या कार्यक्रमानंतर झालेल्या वादातून एका १७ वर्षीय मुलाने भाजी कापण्याच्या चाकूने वार करून तरुणाचा खून केल्याची धक्कादायक घटना घडली. गुरुवारी रात्री ११.१५ वाजताच्या सुमारास बेसा– मानेवाडा रोडवरील अजनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या घटनेने तणाव निर्माण झाला होता.

योगेश अनिल काकडे, रा. श्रीकृष्णनगर असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी अल्पवयीन मुलगा पीओपी (प्लास्टर ऑफ पॅरिस) कामासाठी मजुरी करतो. गुरुवारी श्रीराम मंदिर प्राणप्रतिष्ठा महोत्सवानंतर आरोपी व योगेश काकडे यांच्यात कडाक्याचे भांडण झाले. आरोपीने मद्यपानावर सुमारे १,१०० रुपये खर्च झाल्याचे सांगत ते पैसे परत देण्याची मागणी योगेशकडे केली. मात्र या मागणीवरून दोघांमध्ये वाद झाला. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. योगेश काकडे यांनी आरोपीला मारहाण केल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे. आरोपीने मारहाण थांबवण्याची विनंती केली.मात्र योगेश त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करत मारहाण सुरूच ठेवत होता. त्यामुळे संतप्त झालेल्या आरोपीने त्याच्या कमरेत लपवून ठेवलेला भाजी कापण्याचा चाकू काढत योगेशच्या छातीवर आणि कमरेखाली दोन वार केले.

योगेशने आरडा- ओरड केली. त्यानंतर आरोपी तेथून पसार झाला. दरम्यान घटनास्थळी बघ्यांची गर्दी जमली. त्यामुळे तणाव निर्माण झाला होता. उपस्थितांपैकी काहींनी पोलिसांच्या मदतीने गंभीर जखमी झालेल्या योगेश काकडेला तातडीने रुग्णालयात हलवले. परंतु योगेशचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच अजनी पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, साक्षीदारांचे जबाब आणि तांत्रिक माहितीच्या आधारे पोलिसांनी काही तासांतच आरोपीला ताब्यात घेतले. या प्रकरणी अजनी पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी अल्पवयीन असल्याने त्याच्यावर बाल न्याय कायद्यानुसार पुढील कारवाई करण्यात येत आहे.

# प्रेमविवाहाच्या रागातून तरुणाची हत्या

▸विदर्भ केसरी। महागाव

प्रेमविवाह विवाह केल्याच्या जुन्या रागातून सासरच्या मंडळींनी एका तरुणाला व्यवसायाचे आमिष दाखवून बोलावून घेतले आणि त्याची निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना महागाव तालुक्यातील फुलसावंगी येथे घडली आहे. याप्रकरणी महागाव पोलिसांनी दोन आरोपींविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला असून तपास सुरू केला आहे.

उत्तर प्रदेशातील कानपूर देहात येथील रहिवासी असलेला मयत अनुज जाधव (वय ३० अंदाजे) याने ८ जानेवारी २०१८ रोजी पिंकी देवी (भारत सिंह जाधव यांची मुलगी) हिच्याशी अलाहाबाद उच्च न्यायालयात प्रेमविवाह केला होता. या विवाहामुळे पिंकीचे वडील भारत सिंह मर्दानसिंह जाधव आणि भाऊ रवी भारत सिंह जाधव (दोन्ही रा. फुलसावंगी, ता. महागाव) हे अत्यंत संतापलेले होते. ते सातत्याने अनुजला जीवे मारण्याची धमकी देत असत.

अनुज उत्तर प्रदेशातील आपल्या मूळ गावी न जाता मध्य प्रदेशातील राजगढ येथे पत्नी व मुलांसह राहत होता. मात्र, जून २०२५ मध्ये सासरच्या मंडळींनी त्याला विश्वासात घेतले आणि व्यवसायाचे आमिष दाखवून फुलसावंगी येथे राहण्यासाठी बोलावून घेतले. ६ जानेवारी २०२६ च्या रात्री ११ ते ७ जानेवारीच्या पहाटे दरम्यान, आरोपी भारत सिंह जाधव (५२) आणि रवी भारत सिंह जाधव (२६) यांनी संगनमत करून अनुजची हत्या केली. अनुजचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात पडलेला आढळला असून, त्याच्या डोक्याच्या मागील भागावर गंभीर जखमा होत्या. ही हत्या प्रेम विवाहासोबतच जात आणि प्रतिष्ठेच्या वादातून झाल्याचा संशय मृतकाचा भाऊ नेकपाल सिंह जाधव यांने व्यक्त केला असुन त्याच्या फिर्यादीवरून महागाव पोलिसांनी आरोपींविरुद्ध कलम १०३(१), ३(५), ३५१(२), भारतीय न्याय संहिता नुसार गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार धनराज निळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अमोल राठोड करत आहेत. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून ऑनर किलिंगच्या दिशेनेही पोलीस तपास करत असल्याची चर्चा आहे.

# विदर्भातील ट्रक थेट पाकिस्तानात

▸विदर्भ केसरी। वर्धा :




चोरट्यांचे अनेक प्रकार. भुरटे, लुटारू, दरोडेखोर आदी. पण त्यामागे एक गणित असते. चोरी कश्यासाठी, हा तपासकामातील मुख्य निकष असतो. त्यातूनच रहस्य उघडकीस येत असते. कोरा करकरीत एक नवा दहा चाकी हायना ट्रक दारी उभा. ५० लाख रुपये मोजून घेतलेला. त्याद्वारे काही कमाई करण्याचा उद्देश पिपरी मेघे येथील रहिवासी किशोर पांडुरंग उरकुडे यांनी ठेवला होता. पण दारी उभा ट्रक बेपत्ता झाल्याचे पाहताच त्यांचे धाबे दनाणले. पोलीस तक्रार केली. काहीच धागेदोरे नसतांना हा तपास म्हणजे एक आव्हान होते. पण शेवटी ट्रक हाती लागलाच. वेगळ्या रंगात.

ट्रक चोरी झाल्याची तक्रार होताच रामनगर पोलीस कामास लागले. रात्री गस्तीवर असतांना याच परिसरात एक स्कोर्पिओ गाडी संशयास्पद स्थितीत दिसून आली होती. त्याचा माग काढण्यात आला. समृद्धी मार्गावर सिसिटीव्ही फुटेज तपासल्यावर सत्य पूढे आले. तपास चमुने असाच मागोवा घेत पाठलाग सूरू केला. हरियाणा, गुजरात, राजस्थान, मध्य प्रदेश असा ९ दिवसाचा प्रवास एकाच ड्रेसमध्ये करीत पोलीस चमू चौकशी करीत गेली. राजस्थान, गुजरात भागात हेच दहा चाकी हायना वाहन मोठ्या प्रमाणात धावत असल्याचे दिसून आले. स्थानिक खबरी शोधून तपास झाला. ही अशी वाहने रंग बदलून गुजरात वाटे पाकिस्तानात विकणाऱ्या टोळ्या सक्रिय असल्याची माहिती पुढे आली.

शेवटी एकदाचा अथक शोध थांबला. खबरी लोकांनी दिलेली माहिती कामात आली. मध्य प्रदेशातील आलियापूर जिल्ह्यातील अती दुर्गम जंगल भागात हा हायना ट्रक आढळून आला. ट्रकचे रंगकाम सूरू होते. ते झाले की ट्रक पाकिस्तानात विकल्या जाण्याच्या वाटेवर. मात्र पोलीस पाठलाग करीत असल्याचा सुगावा लागतच चोरटे जागेवरून पसार झाले होते. आता आरोपीचा शोध सूरू आहे. ट्रक जप्त करण्यात आला आहे.

कुठलाच मागमूस नसतांना ही चोरी उघडकीस आणणे म्हणजे एक दिव्य काम होते. पण अखेर शोध लागलाच. तांत्रिक तपास व पोलीस अधीक्षक सौरभ अग्रवाल यांनी कठीण प्रसंगी केलेले मार्गदर्शन कामी आल्याची भावना पोलीस उपनिरीक्षक तपास अधिकारी दिनेश कांबळे व्यक्त करतात. तपास पथकात अंबादास टोपले, अलीम शेख, गजानन म्हस्के, प्रसाद शिंदे, विशाल देवकाते, योगेश चन्ने, राहूल भोयर, रुपेश उगेमुगे, सचिन पवार, अवी बनसोड, मुकेश वांदिले, नरेंद्र पारशर, विकी अनेराव, मनोज भोसले, स्थानिक गुन्हा शाखेतील आशिषसिंग ठाकूर, संजय राठोड, दीपक साठे, मिथुन जिचकार तसेच तांत्रिक मदत देणारे सायबर सेलचे गोविंदराव मुंढे व अक्षय राऊत यांचा समावेश होता. तसेच पोलीस अधीक्षक सौरभ अग्रवाल, अपर अधीक्षक सदाशिव वाघमारे, उपविभागीय अधिकारी प्रमोद मकेश्वर, गुन्हा शाखेचे विनोद चौधरी व ठाणेदार अजय भुसारी यांनी तपासात मार्गदर्शन केले.

# बुलढाण्यात एसटी बसचा थरार



▸विदर्भ केसरी। बुलढाणा :

महाराष्ट्रातील बुलढाणा जिल्ह्यात एसटी बसचा अपघात थोडक्यात टळला. चालकाने प्रसंगावधान राखल्यामुळे बसमध्ये असलेल्या ३० जणांचे प्राण वाचले.

वरुड परिसरात धाड–बुलढाणा मार्गावरुन बस पुढे जात होती. वरुड–सोयगाव–जामठी मार्गावर धावणाऱ्या बसचा नेहमीप्रमाणे वेगाने प्रवास सुरू होता. प्रवासी बसमध्ये बसले होते आणि आपापल्या कामात मग्न होते अथवा झोपले होते. अचानक जोराचा आवाज ऐकू आला. सगळ्यांचे लक्ष आवाजाच्या दिशेने वेधले गेले. काही क्षणांतच ब्रेक काम करत नसल्याचं चालकाच्या लक्षात आलं. रस्त्याच्या दुतर्फा वस्ती आणि वर्दळ असल्याने परिस्थिती अधिकच धोकादायक झाली होती.

वेगात असलेली बस थांबवण्यासाठी चालकाने प्रसंगावधान राखून निर्णय घेतला. समोर येणाऱ्या लोकांना किंवा घरांना धडक होऊ नये म्हणून बस एका विद्युत खांबाला धडकवण्यात आली. त्यानंतर बस रस्त्याच्या कडेला जाऊन थांबली.

या घटनेत कोणालाही गंभीर दुखापत झाली नसून एक दुचाकीस्वार थोडक्यात बचावला. बसमधील सर्व प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढल्यानंतर सर्वांनीच सुटकेचा श्वास घेतला. चालकाच्या धाडसामुळे मोठा अनर्थ टळल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

दैनिक
# विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू
शनिवार, २४ जानेवारी २०२६ | २

# गद्दारी हा महाराष्ट्राला लागलेला शाप !

## आम्ही वादळात खेळत मोठे झालो आहोत, आम्हाला लढायचे कसे हे कोणी शिकवू नये- उद्धव ठाकरे

**▸विदर्भ केसरी।**

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या प्रारंभी उद्धव ठाकरेंनी आपल्या बालपणीच्या आठवणींना उजाळा देत, राज ठाकरेंसोबत आपण 'वादळात' खेळून मोठे झाल्याचे आवर्जून सांगितले. वडिलांशी असलेले नाते आणि आईने (मा) घर सावरण्यात दिलेल्या योगदानाचा गौरव करतानाच त्यांनी आपल्या घराण्याबद्दल सार्थ अभिमान व्यक्त केला. तसेच, विरोधकांवर आणि गद्दारांवर कडाडून टीका करताना 'गद्दारी हा महाराष्ट्राला लागलेला शाप' असल्याचे सांगून, भगव्याशी गद्दारी झाली नसती तर महाराष्ट्राने जगाचा इतिहास बदलला असता, असा रोखठोक विचार त्यांनी यावेळी मांडला.



उद्धव ठाकरे म्हणाले, आजपासून शिवसेनाप्रमुखांचे जन्मशताब्दी वर्ष सुरू होत आहे. पुढच्या वर्षी 100 वर्ष पूर्ण होणार आहेत. आपण अनेकांनी चढ उतार पाहिले आहेत. राज आणि माझे बालपण एकत्र गेले आहे. आम्ही वादळात खेळत मोठे झालो आहोत. त्यामुळे आम्हाला वादळाशी कसे लढायचे, हे आम्हाला कोणी शिकवण्याची गरज नाही. आज आपल्याशी बोलताना तो सगळा काळ डोळ्यांसामोरून जात आहे.

मी नेहमी सगळ्यांना सांगतो की शिवसेनाप्रमुख, हिंदूहृदयसम्राट ही ओळख लोकांसाठी. वडील आणि मुलाचे नाते वेगळे होते. माझे आजोबा म्हणजे जमदग्नीचा अवतार आणि तसे वडील आणि त्याच्या विरुद्ध आमची मा. या सगळ्यात माचे योगदान फार मोठे आहे. मा ने शांतपणे संपूर्ण घर सांभाळत होती, अशी आठवण उद्धव ठाकरे यांनी यावेळी सांगितली.

पुढे बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, आम्ही काही लढाईला घाबरणारे नाही आहोत. मराठ्यांचा इतिहास जेवढा रक्तरंजित आहे, कदाचित तसा इतिहास जगाच्या पाठीवर दुसऱ्या कोणाचा नसेल. पण त्या रक्तरंजित इतिहासात पाठीवरचे वार हे जास्तकरून गद्दारांनी केले आहेत. याचे जास्त दुःख आहे. काय मिळवले? मुंबईवरचा भगवा उतरवला, काय महापौर पद? जे जे गड मुंबईचे होते ते गड आजही शाबूत आहेत. आपल्याला जपणारे कोण आहे, याचा विचार मुंबईकरांनी तसेच इतरांनी देखील केला पाहिजे. आपल्या जीवाचा सौदा करणारा आणि वाचवणारा कोण? याचा विचार लोकांनी करायला पाहिजे. गद्दारी करणाऱ्यांना किती 50 खोके मिळाले, मी गेलो तर मला किती मिळतील? पण मी गेलो तर मला यांचे नाव घेता येणार नाही, असे म्हणत उद्धव ठाकरेंनी बाळासाहेब आणि प्रबोधनकार ठाकरेंच्या फोटोकडे हात दाखवला.

उद्धव ठाकरे भाजपवर टीका करताना म्हणाले, जेव्हा दंगल झाली होती, तेव्हाच्या आता इथे जमलेल्या अनेकांवर आजही केसेस आहेत. तेव्हा मनोहर जोशी मुख्यमंत्री होते तेव्हा त्यांनी श्रीकृष्ण अहवालाला केराची टोपली दाखवली होती. भाजपचा एक सुद्धा त्या दंगलीत नव्हता. गोळीला तुम्ही आणि पोळीला आम्ही, असे भाजपवाल्यांचे आहे. प्रत्येक वेळेला लढा म्हटले की शिवसैनिक. नंतर मग फोटो काढायला हे येतात. आम्ही हिंदू आहोतच. या देशात आपण हिंदू बहुसंख्य आहोत,

### मला माझ्या घराणेशाहीचा अभिमान

■ हे जे काही आमचे घर आहे, घराने आहे, तुम्ही त्याला घराणेशाही म्हणा, मला अभिमान आहे, असे उद्धव ठाकरे म्हणाले. आता जे विरोधक आहेत, त्यांना त्यांच्या वडिलांचे नाव घ्यायला लाज वाटत असेल. जेव्हा आपण महाराष्ट्राचा विचार करतो तेव्हा जर इतिहास पाहिला तर गद्दारी हा विषय पूर्वापार चालत आलेला आहे. गद्दारी हा आपल्याला लागलेला शापच आहे. जेव्हा विजय अशक्य असतो तेव्हा आपला शत्रू गद्दारांची मदत घेत असतो. गद्दारी जर भगव्याशी झाली नसती, तर या महाराष्ट्राने जगाचा इतिहास बदलून दाखवला असता.

### गुलाम म्हणून जगणार नाही

■ उद्धव ठाकरे पुढे म्हणाले, ठाकरे नावाचे झाड का तोडायची आहे यांना, तर या झाडाची खाण होत नाहीये. आज मुंबईत या निवडणुकीत पैशांचा वापर केला गेला. विकत घेत आहेत तुम्ही? मत विकत घेऊ शकतात, पण मन कसे विकत घेणार? कोण आहोत आम्ही? ठाकरे म्हणजे कोण आहोत? शिवसेना पुसून टाका आणि मग मुंबई आणि महाराष्ट्राचा विचार करा. बाळासाहेबांनी मराठी माणसाला जगायचे कसे हे आधी शिकवले. जर जगायचे कसे हेच आपण विसरून गेलो तर जसे पूर्वी गुलामगिरीत जगायचो, तसेच या दोन व्यापरांच्या गुलामीत जगावे लागेल. मेलो तरी बेहत्तर, पण त्या दोन व्यापऱ्यांचे गुलाम म्हणून जगणार नाही, असे म्हणत पंतप्रधान मोदी आणि अमित शहा यांच्यावर निशाणा साधला.

## अग्रलेख

# महिलांना लॉटरी

*मागच्या आठवड्यात मकर संक्रांतीनिमित्त महिलांनी वाण लुटले. महिलांच्या याच आनंदाला पारावार उरलेला नसताना अशा परिस्थितीत मराठवाड्यात महापौरपदासाठी महिलाराज येणार. मराठवाड्यातील पाचपैकी तब्बल तीन जागांवर महिलाराज असणार आहे. गुरुवारी झालेल्या आरक्षण सोडतीचा हा निर्णय मराठवाड्यातील भावी महिला महापौरांच्या आनंदाला उधाण आणणारा आहे.*

*मराठवाड्यात असलेल्या पाचपैकी तीन महानगरपालिकेत महापौरपदी विराजमान होण्याची संधी महिलांना मिळणार आहे. मराठवाड्यात सर्वाधिक महिला महापौर असणार आहेत. महिलांसाठी असलेली ही लॉटरीच म्हणावी लागणार आहे. नांदेड, जालना तसेच लातूर या तीन महानगरपालिकेत महिलांना महापौरपद सोडतीमध्ये सुटले आहे. महापालिकेतील महापौरपदाच्या आरक्षणासाठी गुरुवारी मंत्रालयात सोडत काढण्यात आली. महापौरपदाच्या पहिल्या अडीच वर्षांच्या कालावधीसाठी ही सोडत आहे. सर्वाधिक प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या या सोडतीकडे सर्वांचे लक्ष लागले होते. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, नांदेड व लातूर या पाच महानगरपालिकांपैकी तीन ठिकाणी महिला महापौर विराजमान होणार आहेत. नगर विकास खात्याच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी सकाळी मंत्रालयातील परिषद सभागृहात महापौरपदाची आरक्षण सोडत काढण्यात आली. महापौरपदाचे हे आरक्षण चक्राकार पद्धतीने काढण्यात आले. त्यामुळे या आधीचे संबंधित महापालिकेचे आरक्षण बाजूला ठेवण्यात आले. आरक्षणासाठी २०११ च्या जनगणनेचा आधार घेण्यात आला आहे. पहिल्या अडीच वर्षांसाठी ही सोडत असणार आहे.मराठवाड्यातील पाच महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी १५ जानेवारीला मतदान होऊन दुसऱ्या दिवशी निकाल जाहीर झाले. पक्षीय बलाबल पाहता नांदेड, जालना व छत्रपती संभाजीनगर या तीन महापालिकेत महापौरपद भाजपकडे असणार आहे, तर परभणी महानगरपालिकेवर उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचा महापौर होणार आहे. लातूरमध्ये काँग्रेस पक्षाला निर्विवाद यश मिळाल्याने मराठवाड्यातील लातूर महापालिकेवर काँग्रेसचा महापौर विराजमान होईल. नांदेड वाघाळा महानगरपालिकेचे महापौरपद सर्वसाधारण महिलेसाठी सोडतीमध्ये निघाले आहे, तर जालना व लातूर या ठिकाणी देखील अनुसूचित जाती महिलेसाठी सोडत निघाली आहे. या तीन ठिकाणी महिला महापौर विराजमान होतील. अनेकदा महिला महापौर किंवा नगराध्यक्ष असल्या तरी त्या ठिकाणी त्यांचे पती किंवा रक्ताचे इतर नातलग त्या पदावर 'स्वतःची' चालवत असतात. महिलांसाठी आरक्षित असलेल्या जागांचा कारभार खरोखर महिलांनी पाहावा, अशी अपेक्षा महिला वर्गातून व्यक्त केली जात आहे; परंतु प्रत्यक्षात महिलांच्या आरक्षणावर पुरुषांचाच कारभार असतो. असा अनेक ठिकाणचा अनुभव आहे. महिला व पुरुषांमध्ये भेदभाव नाही असे बोलण्यापुरते असले तरी प्रत्यक्षात मात्र चित्र वेगळेच असते. छत्रपती संभाजीनगर येथे प्रथमच भाजपचे निर्विवाद वर्चस्व सिद्ध झाले आहे. त्या ठिकाणी राज्याचे मंत्री अतुल सावे तसेच खासदार भागवत कराड व आमदार संजय केनेकर यांच्या मर्जीतला महापौर होईल. जालना येथेही भाजपचे आमदार कैलास गोरंट्याल तसेच माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांच्या माध्यमातून महापौर निवडला जाईल. नांदेडमध्ये भाजपचा महापौर निवडत असताना राज्यसभा सदस्य अशोक चव्हाण यांच्या मर्जीतील नगरसेविकेला संधी मिळेल, तर परभणी येथे उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे खासदार बंडू जाधव यांच्या मर्जीतील महापौर असणार आहेत. लातूरमध्ये माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या विचारसरणीचा व आमदार अमित देशमुख यांच्या विश्वासातील महिलेला महापौरपदाची संधी मिळणार आहे. मराठवाड्यातील पाचही महानगरपालिकेत निवडून आलेल्या नवीन नगरसेवकांना सत्काराचा आनंद घेता घेता आपापल्या भागातील समस्यांचा ताण घ्यावा लागत आहे. जवळपास पाचही महानगरपालिकांचे प्रश्न सारखेच आहेत. पाणी, वीज समस्या तसेच तुंबलेली ड्रेनेज यामुळे नागरिक गेल्या अनेक वर्षांपासून त्रस्त आहेत. छत्रपती संभाजीनगर शहरात गेल्या तीन दशकांपासून पाणीप्रश्न सुटलेला नाही. प्रत्येक निवडणुकीच्या तोंडावर सर्वच राजकीय पक्षांनी पाणीप्रश्न सोडविण्यासाठी आश्वासने दिली. छत्रपती संभाजीनगरमध्ये आठवड्यातून एकदा येणारे पाणी वेळेवर देण्यात महापालिका प्रशासन अपयशी ठरत आहे. पाच दिवसांपूर्वी जलवाहिनी नादुरुस्त झाली. ती दुरुस्त करण्यात बराच वेळ गेला. यामुळे बिघडलेले वेळापत्रक अजूनही सुरळीत झाले नसल्याने छत्रपती संभाजीनगरातील नागरिक संताप व्यक्त करीत आहेत. याबरोबरच अनेक वसाहतींना नऊ ते दहा दिवसांनी पाणीपुरवठा होत आहे. महापालिका निवडणुकीचा निकाल लागून नवीन नगरसेवक निवडून आल्याने नागरिकांच्या अपेक्षा देखील त्यांच्याकडून वाढल्या आहेत. जालना महानगरपालिकेसाठी यावेळी पहिल्यांदाच मतदान झाले. त्या ठिकाणी देखील नगरसेवकांकडून पाण्याच्या बाबतीत नागरिकांच्या मोठ्या अपेक्षा आहेत. दोन वर्षांपूर्वी लातूरला रेल्वेने पाणी आणावे लागले होते. हा प्रसंग संपूर्ण राज्यात चर्चेचा ठरला होता. त्या ठिकाणी काँग्रेसची सत्ता आलेली आहे. त्यामुळे काँग्रेसच्या महापौरांना लातूरमध्ये पाण्याचा प्रश्न मिटवावा लागणार आहे. उन्हाळा काही महिन्यानंतर सुरू होईल, त्यामुळे आत्तापासूनच नगरसेवकांना पाण्याच्या प्रश्नाची चिंता सतावत आहे. नांदेड तसेच परभणी महानगरपालिका अंतर्गत राहणाऱ्या नागरिकांना इतर तीन महापालिकांच्या तुलनेत मुबलक पाणी आहे. फक्त पाणी सोडण्याच्या वेळा ठरविल्याप्रमाणे पाळल्या, तर नागरिकांचा बराच ताण कमी होणार आहे. सुदैवाने मराठवाड्यातील पाचपैकी तीन महापालिकांमध्ये महिला महापौर होणार असल्याने महिलांचा पाण्याबाबत असलेला त्रास या महिलांना लवकर कळेल, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत.*

# केजरीवाल यांची निर्दोष सुटका

**▸विदर्भ केसरी। नवी दिल्ली :**

आम आदमी पक्षाचे राष्ट्रीय संयोजक आणि माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना दिल्लीच्या राऊस अव्हेन्यू न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) बजावलेल्या समन्सकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष करणे आणि चौकशीला हजेरी न लावल्याच्या आरोपातून न्यायालयाने केजरीवालांची निर्दोष सुटका केली आहे. दिल्ली मद्य घोटाळ्याशी निगडीत चौकशीसाठी ईडीने केजरीवाल यांना सहा वेळा समन्स बजावले होते.

केवळ चौकशीला उपस्थिती लावली नाही म्हणजे जाणीवपूर्वक अनादर केला असे म्हणता येत नाही असे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने अरविंद केजरीवाल यांना आरोपातून निर्दोष मुक्त केले. अरविंद केजरीवाल यांनी न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत करत 'सत्यमेव जयते', अशी पोस्ट 'एक्स'वर केली आहे. न्यायालयाकडून आम आदमी पक्षाचे आमदार आणि दिल्ली वक्फ बोर्डाचे माजी अध्यक्ष अमानतुल्ला खान यांनाही दिलासा मिळाला आहे. दिल्ली वक्फ बोर्डातील कथित बेकायदेशीर भरतीशी संबंधित मनी लॉंड्रिंग प्रकरणात अमानतुल्ला खान ईडीसमोर हजर राहण्यास अपयशी ठरल्याचा आरोप त्यांच्यावर होता. अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) केजरीवाल यांच्याविरोधात फेब्रुवारी आणि मार्च २०२४ मध्ये दोन गुन्हे नोंद केले होते. भारतीय दंड संहिता कलम १७४ (सरकारी अधिका-याच्या आदेशाकडे दुर्लक्ष करुन चौकशीला हजर न राहणे) या अंतर्गत केजरीवाल यांच्याविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला होता.

# "तुमच्या भांडणामुळे आपली बदनामी होते" ; वाद मिटवणाऱ्या पुतण्याची काकाकडून हत्या




**▸विदर्भ केसरी।**

सख्ख्या काका-काकूंमधील भांडण सोडवून त्यांना शांत राहण्याचा सल्ला देणे एका २४ वर्षीय तरुणाच्या जीवावर बेतले आहे. किरकोळ वादाचा राग मनात धरून नराधम काकाने झोपेत असलेल्या पुतण्यावर कुऱ्हाडीने सपासप वार करून त्याची निर्घृण हत्या केली.

बुलढाण्याच्या चिखली तालुक्यातील हातणी येथे बुधवारी रात्री ११ वाजेच्या सुमारास ही रक्तरंजित घटना घडली. गोपाल अजाबराव जाधव असे मृत पुतण्याचे नाव असून, पोलिसांनी आरोपी काका विनोद रामचंद्र जाधव ऊर्फ मंत्री याला अवघ्या दोन तासांत बेड्या ठोकल्या आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी विनोद जाधव याचे बुधवारी सायंकाळी त्याच्या पत्नीसोबत जोरदार भांडण झाले होते. काका-काकूंमधील हे सततचे वाद पाहून पुतण्या गोपाल याने मध्यस्थी केली. "तुमच्या रोजच्या भांडणामुळे समाजात आपली बदनामी होते, तुम्हाला वादच करायचे असतील तर या घरात राहू नका," अशा शब्दांत गोपालने दोघांनाही खडसावले होते. आपल्याच पुतण्याने आपल्याला सुनावले, याचा तीव्र राग आरोपी विनोदच्या मनात सलत होता. घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली. माहिती मिळताच चिखली पोलीस ठाण्याचे पथक तातडीने गावात दाखल झाले. पोलीस येत असल्याचे समजताच आरोपी विनोद अंधाराचा फायदा घेत मक्याच्या शेतात जाऊन लपला. मात्र, जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे आणि ठाणेदार भूषण गावंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी शोध मोहीम राबवून अवघ्या दोन तासांत मारेकऱ्याला शेतातून ओढून काढले.

### झोपेतच केला पुतण्याचा घात

■ रात्री ११ वाजेच्या सुमारास गोपाल घरामध्ये लोखंडी पलंगावर गाढ झोपलेला होता. याच संधीचा फायदा घेत खुनशी काका विनोद याने कुऱ्हाड हाती घेतली. त्याने झोपलेल्या गोपालच्या डोक्यावर, चेहऱ्यावर आणि छातीवर कुऱ्हाडीच्या उलट्या बाजूने आणि पात्याने सपासप प्रहार केले. गोपालने जीवाच्या आकांताने ओरडण्याचा प्रयत्न केला, पण वार इतका भीषण होता की त्याचा जागीच मृत्यू झाला.

■ चिखली पोलिसांनी आरोपी विनोद जाधवला अटक करून न्यायालयात हजर केले असता, त्याला एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. पोटच्या मुलाप्रमाणे असलेल्या पुतण्याची अशा प्रकारे हत्या झाल्याने संपूर्ण जिल्ह्यात संताप व्यक्त होत आहे. चिखली पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत असून, घरगुती वादाचे रूपांतर अशा भीषण हत्याकांडात झाल्याने हातणी गावावर शोककळा पसरली आहे.

# प्रजासत्ताक दिनी कर्तव्यपथावर दिसणार 'गणेशोत्सव'



**▸विदर्भ केसरी। नवी दिल्ली :**

देशाचा ७७ वा प्रजासत्ताक दिन सोमवार, २६ जानेवारी रोजी साजरा होणार आहे. प्रजासत्ताक दिनी राजधानी नवी दिल्लीमधील कर्तव्य पथावर होणारे लष्कराचे संचलन, शस्त्रास्त्रांचे प्रदर्शन, थरारक कवायती आणि देशाभरातील विविध राज्यांच्या संस्कृतीचे दर्शन घडवणारे चित्ररथ हे तर खास आकर्षण असते. दरम्यान, यावेळच्या प्रजासत्ताक दिनामध्ये दिल्लीतील कर्तव्यपथावर महाराष्ट्राचाही चित्ररथ दिसणार असून या चित्ररथामधून महाराष्ट्रातीलगणेशोत्सवाचा देखावा पाहता येणार आहे.

प्रजासत्ताक दिनासाठी महाराष्ट्राच्या यावर्षीच्या चित्ररथासाठी आत्मनिर्भरतेचे प्रतीक-गणेशोत्सव ही संकल्पना मांडण्यात आली आहे. महाराष्ट्राच्या चित्ररथामध्ये शाडू मातीपासून घडवलेल्या गणेश मूर्तींच्या प्रतिकृती. कोकणात पारंपरिक पद्धतीने डोक्यावरून नेण्यात येणा-या गणेशमूर्ती, अष्टविनायकांच्या प्रतिकृती, गणेश मंदिरे आदी मांडण्यात आली आहेत. याबरोबरच या चित्रपटासोबत विविध कलाकार हे महाराष्ट्रामधील लोककला आणि परंपरांचेही दर्शन घडवणार आहेत.

दरम्यान, २६ जानेवारी २०२६ रोजी होणा-या प्रजासत्ताक दिनावेळी होणा-या पथसंचालनामध्ये देशातील १७ राज्ये आणि १३ मंत्रालयांचे मिळून ३० चित्ररथ सहभागी होणार आहेत.

# महाराष्ट्र सदन घोटाळ्यातून भुजबळांची निर्दोष मुक्तता

**▸विदर्भ केसरी।मुंबई : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांची महाराष्ट्र सदन घोटाळ्यात एसीबीनंतर आता ईडीच्या केसमध्येही भुजबळांची निर्दोष मुक्तता करण्यात आली. सक्तवसुली संचालनालय भुजबळ यांच्याविरुद्ध मनी लॉन्ड्रिंगच्या प्रकरणाचा तपास करत होते. सार्वजनिक बांधकाम मंत्री असताना त्यांनी कोणतीही निविदा न मागवता के. एस. चामणकर एंटरप्राइजेसला कंत्राट दिले, असा आरोप करण्यात आला होता. छगन भुजबळ आणि इतरांनी निर्दोष मुक्ततेसाठी केलेला अर्ज कोर्टाने मंजूर केला.



लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सरकारी कर्मचा-यांनी अहवालात चुकीची माहिती दिली आणि बनावट ताळेबंद तयार केला. विकासकाला १.३३ टक्के नफा होणार असल्याचे दाखवण्यात आले. मात्र, प्रत्यक्षात तो ३६५.३६ टक्के होता, असा एसीबीचा आरोप होता. सप्टेंबर २०२१ मध्ये विशेष न्यायालयाने छगन भुजबळ यांना या प्रकरणातून दोषमुक्त केले होते. विकासकाने भुजबळ किंवा त्यांच्या कुटुंबाला १३.५ कोटी रुपये दिल्याचा कोणताही पुरावा उपलब्ध नाही. तसेच एसीबीने केलेला नफा-तोट्याचा हिशोब अयोग्य आणि बेकायदेशीर असल्याचे न्यायालयाने नमूद केले होते. कंत्राटाचा अहवाल तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख, परिवहन मंत्री आणि सात वरिष्ठ नोकरशहांच्या समितीसमोर गेला होता. त्यामुळे केवळ चुकीची माहिती देऊन या सर्वांची दिशाभूल केली गेली, हे मान्य करणे कठीण असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले होते.

दुसरीकडे नवी मुंबईतील हेक्सवर्ल्ड नावाच्या गृहनिर्माण प्रकल्पात सदनिका खरेदीदारांची फसवणूक केल्याचा आरोप छगन भुजबळ यांचे चिरंजीव पंकज आणि पुतण्या समीर यांच्यावर होता. २३४४ फ्लॅट्स विकून ४४ कोटी रुपये गोळा केले गेले. परंतु प्रकल्प पूर्ण झाला नाही, असे सांगण्यात आले होते. सप्टेंबर २०२१ मध्ये विशेष न्यायालयाने पंकज आणि समीर भुजबळ यांना या फसवणुकीच्या प्रकरणातून दोषमुक्त केले होते. आता दिल्ली हायकोर्टानेही त्यांना दोषमुक्त केले.

# न्यूझीलंडविरुद्धच्या रायपूर टी २० मध्ये भारताचा विजय, मालिकेत २-० अशी आघाडी

**▸विदर्भ केसरी। रायपूर :**

भारताने न्यूझीलंडविरुद्धची रायपूरमधील टी २० मॅच सात विकेट राखून जिंकली. या विजयासह भारताने पाच मॅचच्या मालिकेत २ - ० अशी आघाडी घेतली. भारताने नागपूरमध्ये झालेली पहिली टी २० मॅच ४८ धावांनी जिंकली होती.

रायपूरच्या मॅचमध्ये टॉस जिंकून भारताने गोलंदाजीचा निर्णय घेतला. न्यूझीलंडने वीस षटकांत सहा बाद २०८ धावा केल्या तर भारताने १५.२ षटकांत तीन बाद २०९ धावा करुन मॅच जिंकली. टी २० मध्ये भारताने सहाव्यांदा २०० पेक्षा जास्त धावांचा आंतरराष्ट्रीय मॅचमध्ये यशस्वी पाठलाग केला. रायपूरच्या मॅचमध्ये भारताने टी २० मधील आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या धावसंख्येचा यशस्वी पाठलाग केला. भारताकडून सूर्यकुमार यादवने नाबाद ८२ तर शिवम दुबेने नाबाद ३६ धावा केल्या. ईशान किशनने ७६ धावा केल्या. अभिषेक शर्मा शून्य धावांवर तर संजू सॅमसन सहा धावा करुन बाद झाला. गोलंदाजीत न्यूझीलंडकडून जेकब डफी, ईश सोधी आणि मॅट हेन्रीने प्रत्येकी एक विकेट घेतली.

फलंदाजीत न्यूझीलंडकडून डेव्हॉन कॉनवेने १९, टिम सेफर्टने २४, रचिन रवींद्रने ४४, ग्लेन फिलिप्सने १९, डॅरिल मिशेलने १८, मार्क चॅपमनने १०, मिचेल सँटनरने नाबाद ४७, झकरी फौल्क्सने नाबाद १५ धावांचे योगदान दिले. भारताकडून गोलंदाजीत कुलदीप यादवने दोन तर शिवम दुबे, हार्दिक पंड्या, वरुण चक्रवर्ती आणि हर्षित राणाने प्रत्येकी एक विकेट घेतली.



दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करून पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l,
Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

### प्रवासादरम्यान दागिने लंपास

कळंब: पोलीस ठाण्यांतर्गत पिंपळशेंडा येथील रहिवासी सौ. शालीनी रवींद्र टेकाम (वय २६) या १३ जानेवारी २०२६ रोजी बसने प्रवास करत होत्या. कळंब ते डोंगर खर्डा दरम्यान अज्ञात चोरट्याने त्यांच्या पर्समधील ६ ग्रॅम सोन्याचे दागिने लंपास केले. या दागिन्यांची किंमत ३०,००० रुपये असल्याचे सांगण्यात आले आहे. या प्रकरणी फिर्यादीने २२ जानेवारी रोजी पोलीस तक्रार दाखल केली. पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) नुसार गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## महत्त्वाचे

### इंदिरा महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शनी

**▸विदर्भ केसरी। कळंब (प्रतिनिधी):-विरेंद्र चव्हाण**

कळंब,:-डॉ. य. मो. दोंदे वाचनालय, बोरीमहाल, श्री रमेश रामचंद्र खवणे वाचनालय, कळंब व इंदिरा महाविद्यालयाचा ग्रंथालय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या मराठी विभागात ग्रंथप्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे. हा उपक्रम सोमवार, दि. २६ जानेवारी ते गुरुवार, दि. २९ जानेवारी २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. या ग्रंथप्रदर्शनात विविध वाङ्मय प्रकारातील आणि विविध विषयांवरील उपयुक्त अशी अनेक प्रकारची पुस्तके उपलब्ध राहणार आहेत. याच दरम्यान वाचकांना 60 टक्क्यांपर्यंत विशेष सवलतीत पुस्तकेही उपलब्ध करून दिली जाणार आहेत. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृतीचा प्रसार करणे व समाजात ग्रंथप्रेम वाढवणे हा असून या ग्रंथप्रदर्शनास विद्यार्थी, शिक्षक, पालक, विविध ग्रंथालयाचे पदाधिकारी व सर्व पुस्तकप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.



### नेताजी सुभाषचंद्र बोस जयंतीनिमित्त गरजूंना ब्लँकेट वाटप!

**▸विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी विजय निखाते**



पुसद तालुक्यातील कोपरा बुद्रुक येथे दिनांक 23 /1/2026 आझाद हिंद सेनेचे संस्थापक नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती निमित्ताने (पराक्रम) दिवस म्हणून सारा भारत देश साजरा करत असतो त्यांच्या जयंती निमित्ताने मौजा कोपरा बु येथे दिव्यांग गरजू ग्रामस्थांना कडाक्याच्या थंडी पासून बचावा करिता एक छोटीशी भेट म्हणून त्यांना ब्लँकेट वाटप करण्यात आले. सर्वप्रथम नेताजी सुभाषचंद्र बोस प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती निमित्त सरपंच सौ आम्रपाली गणेश भगत, उपसरपंच शेख मुख्तार, ग्रामविकास अधिकारी बी. एस. गुळवे यासह सर्व ग्रामपंचायत सदस्य,लिपीक संदीप शेषराव राठोड, ऑपरेटर असीम रब्बानी, रोजगार सेवक नितीन चव्हाण व गावातील असंख्य महिला पुरुष उपस्थित होते

### बाबा कम्बलपोष व आयडियल पब्लिक शाळेत फूड फेस्टिवलचे आयोजन

**▸विदर्भ केसरी। आर्णी**



येथील बाबा कम्बलपोष उर्दू हायस्कूल व आयडियल पब्लिक स्कूलच्या संयुक्त विद्यमाने आज २२ जानेवारी रोजी फूड फेस्टिवलचे आयोजन करण्यात आले कार्यक्रमाचे उदघाटन आयडियल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सैयद मक्सूद अली पटेल, नगर सेवक सैयद रियाज, जावेद सोलंकी समद पहेलवान, पत्रकार नौशाद अली , नईम फानन, हाफीज उमेर,इरफान पटेल आदींनी केले. यावेळी या फेस्टिव्हलमध्ये विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे स्टॉल्स लावले होते . या मध्ये केजी १चा विद्यार्थी अरमान शेख याने स्वादिष्ट ब्रेड पकोडा, वर्ग १चा विद्यार्थी उक्बा हाफीज उमेर याने दही बडा , फातेमा सैयद हिने पास्ता आणि मोमोज,ताहेरा शेख हिने दोसा,जिनत शेख हिने पोट्याटो ट्विस्टर, शाहिद शेख याने पाणी पुरी तसेच वर्ग दहावीची विद्यार्थ्यांनी कु लायबा शेख हिने स्वादिष्ट आलु समोसा व अंडा पकोडा त्याच प्रमाणे पुरी भाजी, पाणी पुरी,भेळ,खस्ता, कच्चा चिवडा,दहिपुरी, विविध प्रकारचे आईस्क्रीम, बादाम शेक,खिचडा आदी स्टॉल्स लावण्यात आले होते या वेळी प्रमुख पाहुणे तसेच शिक्षक व पालकांनी विविध स्टॉल्सला भेट देऊन विविध व्यंजनाचा आस्वाद घेतला . या वेळी विद्यार्थ्यांनी मनोरंजनात्मक कार्यक्रम ही घेतला तसेच सामान्य ज्ञान च्या आधारावर विद्यार्थ्यांना प्रश्न ही विचारण्यात आले. ज्या मुलांनी अचुक उत्तर दिले त्यांना पुरस्कृत ही करण्यात आले. या कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी फिरदौस शाहीन सैयद, खालिद शेख, फौजिया आफरीन सैयद नौशाद अली,अजीज चौव्हाण, मुजीब शेख, सोहेल खान,अकरम बेग, तसेच आयडियल पब्लिक शाळेचे मुमताज बेग, अर्शिया शेख, रुखसार शेख, सानिया सैयद, शहेजीन शेख, आदींनी परिश्रम घेतले.

# वकिलासोबत हुज्जतबाजी

## वकील संघाची पोलिस ठाण्यात धाव :धमकी दिल्याची तक्रार

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ :**




कौटुंबिक न्यायालयात सुरू असलेल्या प्रकरणातील पक्षकाराने शुक्रवार, २३ जानेवारी दुपारी विरोधी वकिलाला अश्लील शिवीगाळ केली. तसेच जिवाने मारण्याची धमकी देत हुज्जतबाजी केली. या प्रकरणामुळे संतापलेल्या वकील संघाच्या पदाधिकाऱ्यांनी शहर पोलिस ठाण्यात धडक देत तक्रार दिली. त्या पक्षकारावर कारवाई करावी, अशी मागणी तक्रारीतून करण्यात आली आहे. पती-पत्नीच्या वादाचे कौटुंबिक न्यायालयात सुरू होती. या प्रकरणात पक्षकाराचा वकील नागपूरचा आहे. या प्रकरणात शुक्'वारी युक्तिवाद झाला. त्यानंतर पक्षकाराने चक्क विरोधी वकील ॲड. तुषार देशपांडे यांना अश्लील भाषेत शिवीगाळ केली. एवढ्यावरच न थांबता जिवे मारण्याची धमकी देत वादावादी केली.

त्यामुळे वकिलांमध्ये संतापाची लाट निर्माण झाली होती. काही वेळातच न्यायालयात वकील संघाचे तसेच सदस्य एकत्रित जमले. प्रकरणाचे गांभीर्य ओळखून या सर्व पदाधिकाऱ्यांनी थेट शहर पोलिस ठाणे गाठले. ठाणेदार रामकृष्ण जाधव यांची भेट घेतली. संपूर्ण प्रकरणाची हकिगत त्यांच्यासमोर कथन केली. त्यानंतर पोलिस ठाण्यात तक्रार देण्यात आली. अश्लील शिवीगाळ करीत धमकी देणाऱ्या व्यक्तीविरोधात कारवाई करावी, अशी मागणी तक्रारीतून करण्यात आली. त्याचप्रमाणे वकिलांना संरक्षण अशी मागणी केली.

यावेळी पोलिस ठाण्याच्या प्रवेशद्वारावर वकिलांनी नारेबाजी केली. यावेळी अध्यक्ष ॲड. संजय जैन, ॲड. अमित बदनोरे, ॲड. मीनाजउद्दीन मलनस, ॲड. शीतल जयस्वाल, ॲड. कोमल पटेलिया, ॲड. विपिन ठाकरे, ॲड. नासीर खिलजी, ॲड. शाहरूख, ॲड. प्राजक्ता टिकले, ॲड. अमोल बोरखडे, ॲड. चेतन गांधी, ॲड. दर्शन कोठारी यांच्यासह मोठ्या वकील संघाचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

# गैरप्रकाराबाबत बार असो. ची एसींकडे तक्रार



**▸विदर्भ केसरी। यवतमाळ:**

- आज दिनांक २३/०१/२०२६ रोजी न्यायालयीन परीसरामध्ये एक विधिज्ञाला प्रकरणातील विरुद्ध पक्षकाराने अश्लील आणि अपमानास्पद भाषेचा अवलंब करून गंभीर गैरवर्तन केले असून, हा प्रकार अत्यंत निंदनीय असून न्यायव्यवस्थेला व्यथित करणारे आहे. न्यायालय परिसर हा न्याय, शिस्त आणि सन्मान यांचे प्रतीक असून अशा ठिकाणी वकिलांवर होणारा कोणताही अपमान सहन केला जाणार नाही.

सदर घटनेच्या अनुषंगाने संबंधित व्यक्तीविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी आज मा. जिल्हाधिकारी साहेब यवतमाळ व मा. पोलीस अधीक्षक साहेब यवतमाळ यांची भेट घेत सदर व्यक्तिविरुद्ध कठोर कार्यवाही करणेहेतु निवेदन फॅमिली कोर्ट बार असोसिएशन यवतमाळ तर्फे देण्यात आले आणि त्यादरम्यान आरोपी कडून वकिलांवर होत असलेल्या खोटे आणि बनावट आरोपांवर विश्वास ठेवण्यात येऊ नये व अनुचित कारवाही टाळावी असे निवेदित करण्यात आले. वकिलांच्या सुरक्षिततेसाठी आणि त्यांच्या सन्मानाच्या रक्षणासाठी Advocate Protection Act (वकील सुरक्षा कायदा) लागू करण्यात यावा, अशी ह्यावेळी तीव्र मागणी करण्यात आली. वकील हा न्यायव्यवस्थेचा एक महत्त्वाचा घटक असून, त्यांच्या सुरक्षिततेवर होणारा कोणताही हल्ला हा संपूर्ण न्यायप्रक्रियेवर हल्ला मानला जातो. त्यामुळे दोषींवर कठोर कारवाई करून कायमचा धडा शिकवला जावा जेणेकरून ह्यापुढे असे गैरप्रकार घडणार नाही. सदरचे प्रकरण घडल्याने वकिलांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून वकील एकजुटता पाहायला मिळत आहे.

# विघ्नवाट पुरस्काराने सन्मानित

**▸विदर्भ केसरी।**



मुंबई येथील कोहिनूर फिल्म फेस्टिवल 2025 मध्ये विघ्नवाट संघर्ष शेतकऱ्याचा या लघुपटला बेस्ट सोशल फिल्मचा अवॉर्ड मिळाला. बेस्ट ऍक्टर सचिन शेळके आणि बेस्ट एक्ट्रेस प्रतिभा पवार यांना मिळाला असून २०० पार्टिसिपेट मधून स्पेशल कोहिनूर अवार्ड 2025 हा प्रतिभा पवार यांना प्रदान करण्यात आला त्यामुळे संपूर्ण विघ्नवाट चे आणि सर्व कलाकारांचे हार्दिक अभिनंदन आणि कोहिनूर फिल्म फेस्टिवलचे मनापासून खूप खूप धन्यवाद दिले.

कार्यक्रमादरम्यान प्रतिभा पवार यांनी आपले मनोगत व्यक्त केले त्यामध्ये त्यांनी विघ्न वाट लघुपटाचा सारांश सांगितला असून सर्वांना हा लघुपट पाहण्याकरिता प्रेरित केले तसेच या लघुपटामध्ये सहकलाकार अतुल पवार अभिषेक यादव , विवेक राठोड,देव बनसोड, राम जांभुरे, राहुल साळवे, भरत शिंदे,साधना पवार तसेच बाल कलाकार आरुषी गुजर यांनी उत्कृष्ट अभिनय करून या पुरस्कारामध्ये त्यांचा सुद्धा वाटा आहे तसेच छायाचित्रांकन, एडिटिंग चे काम ईश्वर ठाकरे यांनी केले असून लेखक, निर्माता ,दिग्दर्शक प्रतिभा पवार, सहलेखक विजयपाल शृंगारे यांचा सुद्धा मोलाचा वाटा आहे असे प्रतिभा पवार यांनी सांगितले,@pratibhapawar84 या यूट्यूब चॅनेलवर पहावे असे आवाहन केले यावेळी ज्युरी नी लघुपटाची प्रशंसा केली , या फिल्म फेस्टिवल मध्ये देश विदेशातून 200 गुण अधिक लघुपट सहभागी झाले होते तसेच महाराष्ट्र सह विविध राज्यातील प्रदेशातील नामवंत कलाकार दिग्दर्शक आणि चित्र पटसृष्टीतील मान्यवर या सोहळ्याला उपस्थित होते,

या लघुपट सोहळ्यामध्ये प्रतिभा फाउंडेशनचे अध्यक्ष इंजि.प्रतिभा पवार तसेच सचिव सचिन शेळके उपस्थित होते, यावेळी फेम फेस्टिवल चे आयोजक दिनेश जाधव यांचे आभार मानण्यात आले, प्रतिभा फाउंडेशन नेहमी सामाजिक विषयावर आधारित लघुपट बनवत असते आणि यानंतरही बनवत राहील असे आश्वासन प्रतिभा पवार,आणि सचिन शेळके यांनी दिले

# आदिवासी विकास विभागातील महिला कर्मचारी संघटनेच्या अध्यक्षपदी सुवर्णा इंगोले

**▸विदर्भ केसरी। आर्णी प्रतिनिधी : बबिता शिवणकर**



महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ, पुणे अंतर्गत आदिवासी विकास विभागातील महिला कर्मचारी संघटनेच्या अध्यक्षपदी श्रीमती सुवर्णा भिमराव इंगोले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्या सध्या शासकीय इंग्रजी माध्यम आश्रमशाळा, पाळोदी, तालुका आर्णी, जिल्हा यवतमाळ येथे स्त्री-अधिक्षिका म्हणून कार्यरत आहेत.

महासंघाच्या अधिकृत आदेशान्वये, प्राप्त अधिकार व शक्तींच्या अधीन राहून ही नियुक्ती करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. या नियुक्तीमुळे आदिवासी विकास विभागातील महिला कर्मचाऱ्यांच्या संघटनात्मक कार्याला नवे बळ मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. नियुक्तीनंतर श्रीमती इंगोले यांच्यावर महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली असून, त्यांनी आदिवासी विकास विभागातील महिला कर्मचाऱ्यांची राज्यस्तरीय व विभागस्तरीय कार्यकारिणी गठीत करून त्याचा सविस्तर अहवाल तातडीने केंद्रीय समितीकडे मंजुरीसाठी सादर करावा, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे. महिला कर्मचारी संघटनेच्या माध्यमातून महिलांच्या समस्या, हक्क, प्रशासकीय अडचणी तसेच सेवाशर्ती संदर्भातील प्रश्न प्रभावीपणे मांडण्याचे कार्य करण्यात येणार आहे. तसेच महासंघाच्या विचारांचा प्रचार व प्रसार करून संघटनेचा क्षेत्रीय विस्तार वाढविण्यावर भर देण्यात येणार आहे.

श्रीमती सुवर्णा इंगोले या शैक्षणिक, प्रशासकीय व सामाजिक क्षेत्रातील अनुभवी अधिकारी म्हणून ओळखल्या जातात. त्यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी विकास विभागातील महिला कर्मचारी संघटना अधिक सक्षम व संघटित होईल, असा विश्वास महासंघाच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे.

महासंघाच्या महिला कर्मचारी संघटनेच्या क्षेत्रीय कार्यकारिणीचा विस्तार, संघटनात्मक बांधणी तसेच महिला कर्मचाऱ्यांच्या न्यायहक्कांसाठी संघर्ष करण्यासाठी त्यांच्या पुढील कार्यास महासंघाच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

# बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त अभिवादन कार्यक्रम

## गरजू स्पर्धा परीक्षार्थींना पुस्तिकांचे वाटप व विविध कार्यक्रमाचे आयोजन

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

यवतमाळ,दि.२३ जानेवारी हिंदू हृदयसम्राट,शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त शिवसेना,युवा सेना,व महिला आघाडी यवतमाळ यांच्या वतीने गुरुवारी (दि.२३) यवतमाळ शहरातील दाते कॉलेज चौक येथे भव्य अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमास राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री मा.आमदार संजयभाऊ राठोड यांची विशेष उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात शिवसेनेचे युवासेना जिल्हाप्रमुख प्रद्युम्न जवळेकर यांनी केलेल्या प्रास्ताविकाने झाली. यावेळी पालकमंत्री मा.आमदार संजय राठोड यांनी हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे व नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करत अभिवादन केले. युवा सेना यवतमाळच्या वतीने जिल्हाप्रमुख प्रद्युम्न जवळेकर यांच्या संकल्पनेतून स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते चालू घडामोडी विषयक पुस्तिकेचे वाटप करण्यात आले.या उपक्रमाचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले. अभिवादन कार्यक्रमानंतर स्थानिक दाते कॉलेज चौक परिसरात अन्नदानाचे वाटप सुद्धा करण्यात आले.सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या कार्यक्रमास पश्चिम विदर्भ समन्वयक पराग पिंगळे,जिल्हा संपर्कप्रमुख हरिहर लिंगनवार,जिल्हा संपर्कप्रमुख श्रीधर मोहोड,जिल्हाप्रमुख गजानन डोमाळे,जिल्हा समन्वयक संजय हातगावकर,पश्चिम विदर्भ समन्वयक (आदिवासी विभाग) सुरेशv चिंचोळकर,संजय रंगे,जिल्हाप्रमुख महिला आघाडी दर्शना इंगोले,लोकसभा प्रमुख युवासेना विशाल गणात्रा,शहर प्रमुख शिवसेना निलेश बेलोकार,शहर प्रमुख महिला आघाडी सरला इंगळे,महेश पवार,फिरोज पठाण,अजय खोंड,बाळासाहेब शिंदे,प्रवीण निमोदिया,ज्योती चिखलकर,सौरभ तिवारी,संजय उपगंनलावार,पद्माकर काळे,रमेश अग्रवाल,राहुल गंभीरे,राजू चांदेकर,नवनिर्वाचित नगरसेवक चैताली बेलोकार,लोकेश इंगोले,पिंटू बांगर,सपना उपगनलावार,आकाश परतेकी,पूजा गायकी,शोभा साबळे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते,यवतमाळ शहरातील विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुणाल कांबळे यांनी केले तर आभारप्रदर्शन ज्ञानेश्वर चव्हाण यांनी केले



# अनुभवातूनच साहित्याची निर्मिती : डॉ काळबांडे

**▸विदर्भ केसरी। आर्णी प्रतिनिधी:बबिता शिवणकर**



साहित्य हे समाज जिवनाचा आरसा असतो लेखक त्याला आलेले अनुभव साहित्यातून मांडत असल्याचे प्रतिपादन प्रख्यात साहित्यिक प्रोफेसर डॉ अनिल काळबांडे यांनी व्यक्त केले . ते येथील : स्व. राजकमल जी भारती कला , वाणिज्य व श्रीमती सुशिलाबाई राजकमलजी भारती विज्ञान महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने ' लेखक आपल्या भेटीला' या कार्यक्रमाचे आयोजन दि. 21/ 1 /2026 रोज बुधवार ला करण्यात आले होते. यात सुप्रसिद्ध लेखक मिलिंद महाविद्यालय, मुळावा येथील डॉ. अनिल काळबांडे हे लाभले होते. तर या वेळी प्रमुख अतिथी सकाळचे उमरखेड तालूका बातमीदार बाळासाहेब ओझलवार , वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. विनीत माहुरे, कला विभाग प्रमुख प्रा. सदानंद बोळे, आय. क्यू. ए. सी. समन्वय डॉ. प्रशांत आवते व मराठी विभाग प्रमुख प्रा. उदय चव्हाण हे होते.

' लेखक आपल्या भेटीला' या कार्यक्रमाचे वक्ते व लेखक डॉ. अनिल काळबांडे यांनी, अनुभव हा साहित्याचा गाभा असून समाजाचा आरसा आहे. माणसाला आयुष्यात आलेले चढउतार, दु:ख-दैन्य, खाच-खळगे, जीवन जगत असताना आलेला अनुभव हाच साहित्य निर्मितीला कारणीभूत ठरतो.त्यातूनच त्याची प्रतिभा व कल्पनाशक्तीला प्रेरणा मिळून काव्याची निर्मिती होत असते तसेच विद्यार्थ्यांनी सतत वाचन करीत राहणे गरजेचे आहे. भ्रमणध्वनीच्या जमान्यात वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे. सुखी आयुष्याचे रहस्य उलगडण्याचे सामर्थ्य साहित्यात असते म्हणून उत्तम साहित्य वाचनातूनच आयुष्य समृद्ध होत असते असे प्रतिपादन डॉ . काळबांडे यांनी केले.

संस्थेचे सचिव सिद्धार्थ भारती साहेबांनी कार्यक्रमाला शुभेच्छा देऊन विद्यार्थ्यांसाठी असे उपक्रम राबवावे असे सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शशिकांत वानखडे यांनी मराठी विभागाचे अभिनंदन करून अशा कार्यक्रमामधून विद्यार्थ्यांना साहित्य निर्मिती व काव्य निर्मितीची प्रेरणा मिळू शकते असे सांगितले. तर आपल्या प्रास्ताविक पर भाषणात मराठी विभाग प्रमुख प्रा. उदय चव्हाण यांनी दरवर्षी आपल्या महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांमध्ये साहित्य वाचनाची व लेखनाची आवड निर्माण व्हावी म्हणून वेगवेगळे सुप्रसिद्ध कवी व लेखक यांना निमंत्रित करीत असतो असे सांगून कवी ,लेखक डॉ. काळबांडे सरांचा परिचय करून दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रवीण गायकवाड यांनी केले तर आभार प्रा. मनोज चव्हाण यांनी मानले. कार्यक्रमाला प्रा. चंद्रशेखर खाडे, प्रा. विजय टोकसे, प्रा . शुभम चव्हाण, प्रा. आदर्श चोरडिया, प्रा. सचिन राठोड, प्रा. वैष्णव डाकुलकर, डॉ. मनीषा क्षीरसागर, प्राध्यापिका भुरे मॅडम, विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यशस्वीतेसाठी मराठी विभागाने परिश्रम घेतले.

# आजाद समाज पार्टी (कां) यवतमाळ जिल्हा युवा महासचिव पदी- विशाल डाके

**▸विदर्भ केसरी। पुसद |**



आजाद समाज पार्टी (कां.) यवतमाळ जिल्हा युवा महासचिवपदी विशाल डाके यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती आजाद समाज पार्टी (कां.) यवतमाळ जिल्हा युवा अध्यक्ष राजकुमार भगत यांच्या हस्ते पार पडली. या नियुक्ती कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून भीम आर्मी यवतमाळ जिल्हाध्यक्ष अशोक भालेराव हे उपस्थित होते. तसेच आजाद समाज पार्टी पुसद तालुका अध्यक्ष शरद खंदारे यांचीही प्रमुख उपस्थिती लाभली. या वेळी विशाल डाके यांच्यासह शेकडो युवक व कार्यकत्यांनी आजाद समाज पार्टी (कां.) मध्ये अधिकृतपणे पक्षप्रवेश केला. मोठ्या उत्साहात व जल्लोषात हा कार्यक्रम पार पडला. नियुक्तीनंतर आपल्या भावना व्यक्त करताना विशाल डाके यांनी पक्षाच्या राष्ट्रीय व जिल्हा नेतृत्वाचे आभार मानले. युवकांच्या समस्या, सामाजिक न्याय, संविधानिक मूल्यांचे रक्षण तसेच संघटन अधिक मजबूत करण्यासाठी प्रामाणिकपणे व निष्ठेने काम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. यावेळी बोलताना त्यांनी ठाम शब्दांत आपली भूमिका स्पष्ट करत म्हटले, “माझ्या खांद्यावर कालही निळा होता, आजही निळाच आहे आणि मरेपर्यंत निळाच राहील.” या शब्दांतून त्यांनी चळवळीप्रती असलेली निष्ठा आणि वैचारिक ठामपणा अधोरेखित केला. या कार्यक्रमास पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते व समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विशाल डाके यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## 'स्कूल व्हॅन' चालकामुळे १२ वर्षीय विद्यार्थ्याला ई- सिगारेटचे व्यसन



नागपूर: नागपूरसह राज्यभरात हजारो विद्यार्थी रोज स्कूल बसने शाळा अथवा शिकवणी वर्गात प्रवास करत असतात. या स्कूल व्हॅन चालकावर विश्वास ठेऊनच पालक आपल्या मुलगा अथवा मुलीला प्रवासासाठी त्याच्या स्वाधीन करतो. परंतु या विश्वासाला तडा देणारी धक्कादायक घटना पुढे आली आहे. एका स्कूल व्हॅन चालकाने चक्क १२ वर्षीय विद्यार्थ्याला ई- सिगारेटचे व्यसन लावले. शाळेतील

**महत्त्वाचे**



### हळदी कुंकू उत्सव घरोघरी साजरा - सौ सीमा रमेश घोडे

**विदर्भ केसरी। शेलुबाजार वार्ता :-**

हळदी कुंकू उत्सव म्हणजे मकर संक्रांतीनंतर श्वासिनी महिलांचा एकत्र येण्याचा एकमेकींना हळदकुंकू लावून सौभाग्य आणि समृद्धीची कामना करण्याचा एक पारंपरिक उत्सव असून तिळगुळ देऊन शुभेच्छा दिल्या जातात आणि अन्य प्रकारचे वाण भेटवस्तू दिले जातात ज्यामुळे सामाजिक आनंद वाढतो. भगिनींनी एकत्रित येऊन असंख्य महिला सहभागी होऊन एकमेकांना भेट वस्तू देण्याचा उत्सव साजरा करतात परिसरातील सर्वांच्या घरी ठरल्याप्रमाणे हळदी कुंकांचा उत्सव एकत्रित महिलांच्या उपस्थितीमध्ये आपल्या परिवारावर कृपादृष्टी व्हावी व महादेव शिव पार्वती यांच्या आशीर्वादाने आपले घर भरभरून राहावं अशी प्रार्थना प्रत्येक महिला आपल्या इष्टदेवताकडे चरणी ठेवून प्रार्थना केली जाते. हा सण केवळ संक्रातीपुरता मर्यादित नसून चैत्र गौरी वटपोर्णिमा श्रावण महिना पर्यंत सर्वत्र उत्सव साजरा होत राहतो...!



### निर्मलादेवी जैन इंग्रजी शाळेत हळदी कुंकवाचा कार्यक्रम संपन्न

**विदर्भ केसरी। शेलुबाजार वार्ता**

येथील निर्मलादेवी जैन इंग्रजी शाळेत मकर संक्रांतीचे औचित्य साधून महिला पालकांचा हळदी कुंकवाचा कार्यक्रम शाळेच्या सर्वेसर्वा सौ अनिताताई कर्नावट आणि शाळेच्या सर्व शिक्षिका यांच्यावतीने आयोजित केला होता. या कार्यक्रमाला शाळेतील सर्व विद्यार्थ्यांच्या महिला पालकांना आमंत्रित करण्यात आले होते सर्व महिला पालक मोठ्या संख्येने उपस्थित होत्या सर्वप्रथम त्यांना हळदीकुंकू तीळगुळ देऊन व भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले नंतर सर्व महिला पालकांचे विविध प्रकारचे खेळ घेण्यात आले यानंतर विद्यार्थ्यांच्या प्रगती विषयी चर्चा करण्यात आली अशा तऱ्हेने हा कार्यक्रम संपन्न झाला हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता शाळेच्या शिक्षिका सौ स्नेहा इंगोले. सो भगत. सौ राऊत.सौ येवले.सौ जायभाये. सौ श्रद्धा महल्ले. सौ. हर्षा लकडे(बारड) सौ.भोयर . सौ पांडे. सौ घुगे. कु. मयुरी येवले श्रीमती संध्या गिरी मॅडम. कु. पराते कु. खटाळ सौ अवगन आणि शिक्षकेतर कर्मचारी सौ डोके. सौ शिरसाट.सौ लताबाई.सौ प्रियाताई.यांनी अथक परिश्रम घेतले शेवटी आभार प्रदर्शन कुमारी लकडे मॅडम यांनी केले आणि कार्यक्रमाची सांगता करण्यात आली

### पावर ऑफ मीडिया तर्फे नवनियुक्त स्वीकृत नगरसेवक रामूसेट मालपाणी यांचा सत्कार

**विदर्भ केसरी। दर्यापूर :**

दर्यापूर शहरातील दानशूर व्यक्तिमत्त्व म्हणून ओळख असलेले व "दर्यापूरचे रतन टाटा" अशी ख्याती असलेले नवनियुक्त स्वीकृत नगरसेवक रामूसेट मालपाणी यांचा पावर ऑफ मीडिया तर्फे भव्य सत्कार करण्यात आला. या सत्कारप्रसंगी नरेंद्र माने यांनी रामूसेट मालपाणी यांना शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरविले. समाजसेवा, सामाजिक बांधिलकी आणि सर्वसामान्य नागरिकांप्रती असलेली त्यांची कळकळ लक्षात घेऊन हा सत्कार करण्यात आला. यावेळी गजानन देशमुख, अमोल कंटाळे, अजय वर, नरेंद्र माने, विनोद शिंगणे, सौरभ रहाटे आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी रामूसेट मालपाणी यांच्या सामाजिक कार्याचा गौरव करत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. रामूसेट मालपाणी यांनी आपल्या मनोगतातून सर्व उपस्थितांचे आभार मानत, नगरसेवक पदाच्या माध्यमातून शहराच्या विकासासाठी व जनहितासाठी प्रामाणिकपणे कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला.

### पुण्यात मतमोजणीच्या दिवशी जाळीवर चढून गोंधळ

**विदर्भ केसरी। पुणे :**

मतमोजणी केंद्रावर गोंधळ करून शासकीय कामकाजात जाणीवपूर्वक अडथळा निर्माण केल्याप्रकरणी रुपाली ठोंबरे पाटील यांच्यासह अन्य काही उमेदवार व प्रतिनिधींवर विश्रामबाग पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी कसबा विश्रामबाग वाडा क्षेत्रिय कार्यालयाचे उप अभियंते सुधीर आलुरकर (५२) यांनी फिर्याद दिली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १६ जानेवारी रोजी महापालिका मतदानाची मतमोजणी असताना दुपारी बाराच्या सुमारास रुपाली ठोंबरे पाटील यांनी त्यांच्याकडील हरकत अर्जाची पोहोच द्यावी. म्हणून मतदान मोजणी केंद्राच्या ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टीने उभारलेल्या सुरक्षा जाळीवर चढून आरडाओरड करून निवडणूक प्रक्रियेत व शासकीय कामकाजात जाणीवपूर्वक अडथळा निर्माण केला. तसेच त्यांच्यासोबतअन्य इतर काही उमेदवार व प्रतिनिधींनी देखील आरडा ओरड करून गोंधळ करून निवडणूक प्रक्रियेत व शासकीय कामकाजात जाणीवपूर्वक अडथळा निर्माण केल्याने रुपाली ठोंबरे पाटील यांच्यासह अन्य काही जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक तेली या करत आहेत.

# पालकमंत्री बेपत्ता !

## शोधून काढणाऱ्याला बक्षीस आणि होणार सत्कार.. कवलेवाडा गावात फलक

**विदर्भ केसरी। भंडारा :**




लोकसभा, विधानसभेच्या निवडणुका पार पडल्या. मात्र निवडून आलेले लोकप्रतिनिधी त्यांच्या मतदारसंघाकडे आता ढुंकूनही पाहत नाहीत. निवडणुकीत केलेल्या विकासाच्या बाता आता हवेत विरल्या आहेत. विशेष म्हणजे ज्यांनी जिल्ह्याचे पालकत्व स्वीकारले आहे असे पालकमंत्री देखील भंडाऱ्याला पर्यटन स्थळ समजून केवळ भेट देऊन जातात. त्यामुळे सर्वच मतदारसंघांचा विकास रखडलेला आहे. प्रशासन, लोकप्रतिनिधी, पालकमंत्री यांच्या या उदासीन धोरणाच्या विरोधात आता संतप्त नागरिकांनी आंदोलन पुकारले आहे.

जिल्ह्यातील लाखनी तालुक्यातील कवलेवाडा ग्रामपंचायतीने पालकमंत्री पंकज भोयर व आमदार, खासदार यांचा बेपत्ता असल्याचे फलक लावले जो कोणी त्यांना शोधून देईल त्यांना योग्य ते बक्षीस देऊन त्यांचा तो सन्मान देण्यात येईल अशी घोषणा केली आहे.

ग्रामपंचायतच्या हद्दीतील स्मशानभूमी व इतर विकास कामांची अनेक वर्षांपासून मागणी होत आहे मात्र प्रशासन व राजकीय पुढारी याकडे लक्ष देत नसल्याने ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी उपोषण करत पालकमंत्री आमदार खासदार हे बेपत्ता झाल्याचे फलक लावलेले आहेत. मागणी पूर्ण न झाल्यास राज्यमार्ग बंद करण्याचा इशाराही सरपंच मनिषा खंडाईत, उपसरपंच प्रमोद भुते यांच्यासह ग्रामस्थांनी दिला आहे. पालकमंत्र्यांच्या बाबतीत भंडारा जिल्हा कायमच कमनशिबी राहिला आहे. २०२४ मध्ये विजयकुमार गावित हे पालकमंत्री असताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे अजय मेश्राम यांनी पालकमंत्री बेपत्ता असल्याची तक्रार पोलीस स्टेशनमध्ये केली होती. त्यानंतर २०२५ मध्ये संजय सावकारे यांना भंडारा जिल्ह्याचे पालकत्व देण्यात आले. मात्र सावकारे यांचा मतदारसंघ जळगाव जिल्ह्यातील भुसावळ असून अत्यंत लांबचा असल्याने सावकारे भंडाऱ्याच्या पालकमंत्री पदासाठी फारसे इच्छूक नव्हते. त्यामुळे जिल्ह्यात फक्त झेंडा टू झेंडा म्हणजे १५ ऑगस्ट आणि १६ जानेवारीला ते यायचे. त्यामुळे भंडाऱ्यात त्यांची ओळख झेंडा मंत्री अशी होती. आता २०२६ मध्ये आलेले पालकमंत्री पंकज भोयर हे देखील त्यांच्याच पावलांवर पाऊल टाकत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.

## उद्या भारत गणेशपुरे व सोनाली कुलकर्णींचा गावपातळीवर संवाद

**विदर्भ केसरी। तालुका प्रतिनिधी**




मूर्तिजापुर : मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हा परिषद, अकोला यांच्या वतीने 'सेलिब्रिटी ग्राम भेट' कार्यक्रमाचे आयोजन २५ जानेवारी रोजी करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत सुप्रसिद्ध अभिनेते भारत गणेशपुरे व अभिनेत्री सोनाली कुलकर्णी हे अकोला जिल्ह्यातील मधापुरीत ग्रामपंचायतींत भेट देऊन नागरिकांशी थेट संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश ग्रामपंचायत स्तरावरील विकासकामांची पाहणी करणे, नागरिकांचे प्रश्न जाणून घेणे तसेच शासनाच्या योजनांचा प्रभावी प्रचार-प्रसार करणे हा आहे. सेलिब्रिटींच्या उपस्थितीमुळे ग्रामस्थांमध्ये जनजागृती वाढून विकासकामांना अधिक चालना मिळेल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

या भेटीदरम्यान ग्रामपंचायत कार्यालय, विकासकामे, जलसंधारण, स्वच्छता, शालेय सुविधा, महिला-बालकल्याण तसेच विविध योजनांची अंमलबजावणी यांची पाहणी करण्यात येणार आहे. ग्रामस्थ, शालेय विद्यार्थी, बचत गट सदस्य व स्थानिक प्रतिनिधींशी थेट संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या जाणार आहेत. जिल्हा परिषद प्रशासनाच्या सूचनेनुसार कार्यक्रमासाठी सर्व आवश्यक तयारी, स्वच्छता, सुरक्षा व्यवस्था तसेच नागरिकांचा सहभाग सुनिश्चित करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानामुळे गावागावातील विकास अधिक गतिमान होईल आणि सेलिब्रिटींच्या सहभागामुळे हा उपक्रम जनसामान्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचेल, असा विश्वास जिल्हा प्रशासनाने व्यक्त केला आहे.

## 'कठुआ'मध्ये चकमक




**विदर्भ केसरी।**

जम्मू आणि काश्मीरमधील कठुआमध्ये सुरक्षा दलांना मोठे यश मिळाले आहे. बिल्लावार भागात दहशतवादविरोधी कारवाईत जैश-ए-मोहम्मदचा एक दहशतवादी ठार झाला आहे.

"सुरक्षा दलांनी कठुआ जिल्ह्यातील बिल्लावार भागात ही यशस्वी चकमक केली. लष्कर, सीआरपीएफ आणि जम्मू आणि काश्मीर पोलिसांच्या संयुक्त कारवाईत जैश-ए-मोहम्मदचा एक पाकिस्तानी दहशतवादी मारला गेला. ही कारवाई या प्रदेशात दहशतवादाविरुद्ध सुरू असलेल्या प्रयत्नांचा एक भाग आहे, अशी माहिती जम्मूचे आयजीपी यांनी दिली. हा दहशतवादी अनेक दिवसांपासून सुरक्षा दलांना चकमा देत होता. लष्कर, सीआरपीएफ आणि जम्मू आणि काश्मीर पोलिसांनी केलेल्या संयुक्त कारवाईत जैश-ए-मोहम्मदशी संबंधित एका पाकिस्तानी दहशतवाद्याला ठार मारण्यात आले. ही कारवाई या प्रदेशात सुरू असलेल्या दहशतवादविरोधी प्रयत्नांचा एक भाग आहे.


## नगर परिषदेत स्थायी समिती निवड प्रक्रियेवर वाद

### नगर विकास आघाडीने न्यायासाठी हालचाली सुरू केल्या

**विदर्भ केसरी।**

चांदूर बाजार नगर परिषद स्थायी समितीच्या निवडणुकीपूर्वी नगर विकास आघाडीने जिल्हा नगर परिषद प्रशासन तसेच चांदूर बाजार नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना विषय समित्यांमध्ये वाढ करून स्थायी समितीची सदस्य संख्या सात करण्यात यावी, असे निवेदन सादर केले होते.

यानंतर सभागृहात स्थायी समितीमध्ये सात सभासद असतील, यास मान्यता देण्यात आली. मात्र, निवडणूक अधिकाऱ्यांनी "क" वर्ग नगर परिषदेत चारपेक्षा अधिक विषय समित्या ठेवता येत नाहीत, असे स्पष्ट करत उर्वरित दोन सभासद हे गटांच्या



भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष
शाहिन परविन अब्दुल रशिद
गट नेता, नगरसेवक
नगर परिषद, चांदूर बाजार

२२।१।२६

प्रति,
मा. मुख्याधिकारी
नगर परिषद कार्यालय,
चांदूर बाजार

विषय :- महिला व बालकल्याण समितीमध्ये माझी संमती नसतांना माझे नाव अनुमोदक म्हणून टाकल्याबाबत.

महोदय,

मी आपणास निदर्शनात आणून देते की, महिला व बालकल्याण समितीमध्ये माझी संमती न घेता नाव अनुमोदक म्हणून टाकण्यात आले. समिती गठीत करतांना माझे नाव सदर समितीच्या अनुमोदक म्हणून तुम्ही आहात अशी कुठलीही सुचना मला संबंधीत पीठाधिकारी व तसेच आपण मला दिली नाही. तसेच लोकशाही गटाला मी कोणतीही समंती पत्र दिले नाही. तरी माझे नाव महिला व बालकल्याण समितीमध्ये अनुमोदक म्हणून कसे आले कृपया याचा खुलासा करावा.

प्रत मिळाली

पत्ता - इंदिरा नगर, चांदूर बाजार, जि. अमरावती. मो. ७३८७०२९३१९

गुणतुल्यबळावर नामनिर्देशित केले जातील, अशी माहिती सभागृहात दिली.

मात्र, अमरावती जिल्ह्यातील काही नगर पंचायतींमध्ये विषय समित्यांची संख्या पाच असल्याचे उदाहरण समोर आले असून, नांदगाव खंडेश्वर नगर पंचायत याचे ठळक उदाहरण आहे. त्यामुळे चांदूर बाजार नगर परिषदेत घेतलेला निर्णय संशयाच्या भोवऱ्यात सापडला आहे.

दरम्यान, महिला व बालकल्याण समितीच्या उपसभापती पदाच्या निवडणुकीदरम्यान गंभीर प्रकार घडल्याचा आरोप करण्यात येत आहे. सत्ता पक्षाचे गटनेते श्री. सचिन खुळे यांनी काँग्रेस पक्षाच्या वयस्कर गटनेत्या श्रीमती शाहीन परविन अब्दुल रशीद यांची बांधकाम समितीवर सदस्य म्हणून नेमणूक करायची असल्याचे सांगून धोक्याने विषय समितीच्या सभापती फॉर्मवर अनुमोदक म्हणून सही घेतली. मात्र, अशा वेळी संबंधित गटाचे अधिकृत समर्थन पत्र आवश्यक असते. ते दिलेले नसतांना ही बाब निवडणूक अधिकाऱ्यांना माहीत असूनही त्यांनी जाणीवपूर्वक सभागृहाला माहिती दिली नाही, असा आरोप करण्यात येत आहे. या घटनेविरोधात संबंधित गटनेत्या श्रीमती शाहीन परविन अब्दुल रशीद यांनी प्रहार जणशक्ती पक्षाचे गटनेता सचिन खुळे यांच्यावर एफआयआर दाखल करण्याची घोषणा केली आहे. याला नगर विकास आघाडीचा संपूर्ण पाठींबा असेल. नियमांनुसार, स्थायी समितीत विषय समित्यांचे सभापती व उपाध्यक्ष हे सभासद असतात, तसेच नगराध्यक्ष हे स्थायी समितीचे पदसिद्ध सभापती असतात. त्यामुळे स्थायी समितीत सदस्य म्हणून नामनिर्देशित करायचे असल्यास त्यासाठी रीतसर निवडणूक होणे आणि उमेदवारी अर्ज दाखल होणे आवश्यक आहे, जेणेकरून लोकशाही प्रक्रियेला बळ मिळेल, अशी भूमिका नगर विकास आघाडीने मांडली आहे. या कथित चुकीच्या निवड प्रक्रियेविरोधात न्याय मागण्यासाठी नगर विकास आघाडीचे गटनेते श्री. वैभव घुटे यांनी कायदेशीर तयारी सुरू केली असून, हा विषय लवकरच उच्चस्तरावर जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## आझाद फाऊंडेशनचे वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिर!

**विदर्भ केसरी। राजकुमार चिंचोळकर**



बाळापूर : दिनांक २३ रोजी आझाद फाऊंडेशन, अकोला यांच्या वतीने ग्रामीण भागातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने एक स्तुत्य असा उपक्रम राबविण्यात आला. तालुक्यातील उरळ येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिराला परिसरातील गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून या सुविधेचा लाभ घेतला. या शिबिरासाठी अकोला येथील नामांकित वात्सल्य हॉस्पिटल यांचे विशेष सहकार्य लाभले. शिबिरामध्ये विविध आजारांवर तज्ञ डॉक्टरांकडून सखोल तपासण्या करण्यात आल्या. यामध्ये डॉ. हर्षल मानकर (पचनसंस्था तज्ञ), डॉ. सुवर्णा मानकर (स्त्रीरोग तज्ञ) तसेच डॉ. प्रतीक भेंडे (जनरल फिजिशियन) यांनी रुग्णांची तपासणी करून योग्य उपचार व वैद्यकीय सल्ला दिला. या आरोग्य शिबिरात पचनसंस्थेचे आजार, स्त्रीरोग, सर्वसाधारण आजार, रक्तदाब, मधुमेह यासह विविध आजारांवरील तपासण्या करण्यात आल्या. १२० पेक्षा अधिक रुग्णांची मोफत तपासणी व औषधोपचार करण्यात आले असून अनेक गरजू रुग्णांना या शिबिरामुळे मोठा दिलासा मिळाला. ग्रामीण भागात तज्ञ डॉक्टरांकडून आरोग्य सेवा सहज उपलब्ध होत नसल्याने अशा उपक्रमांचे महत्त्व अधिक वाढते. हे लक्षात घेऊन आझाद फाऊंडेशन, अकोला यांनी हा उपक्रम यशस्वीपणे राबविला. शिबिराचे नियोजन, रुग्ण नोंदणी, तपासणी व औषध वितरणाची जबाबदारी वात्सल्य हॉस्पिटलची संपूर्ण वैद्यकीय टीम व आझाद फाऊंडेशनच्या कार्यकर्त्यांनी उत्तम प्रकारे पार पाडली. या मोफत आरोग्य तपासणी शिबिरामुळे उरळ व परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण असून आयोजकांच्या सामाजिक उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.



## नगरसेवक रामूसेट मालपाणी यांचा सत्कार

**विदर्भ केसरी। दर्यापूर :**

दर्यापूर शहरातील दानशूर व्यक्तिमत्त्व म्हणून ओळख असलेले व "दर्यापूरचे रतन टाटा" अशी ख्याती असलेले नवनियुक्त स्वीकृत नगरसेवक रामूसेट मालपाणी यांचा पावर ऑफ मीडिया तर्फे भव्य सत्कार करण्यात आला.

या सत्कारप्रसंगी नरेंद्र माने यांनी रामूसेट मालपाणी यांना शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरविले. समाजसेवा, सामाजिक बांधिलकी आणि सर्वसामान्य नागरिकांप्रती असलेली त्यांची कळकळ लक्षात घेऊन हा सत्कार करण्यात आला.

यावेळी गजानन देशमुख, अमोल कंटाळे, अजय वर, नरेंद्र माने, विनोद शिंगणे, सौरभ रहाटे आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी रामूसेट मालपाणी यांच्या सामाजिक कार्याचा गौरव करत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. रामूसेट मालपाणी यांनी आपल्या मनोगतातून सर्व उपस्थितांचे आभार मानत, नगरसेवक पदाच्या माध्यमातून शहराच्या विकासासाठी व जनहितासाठी प्रामाणिकपणे कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला.

# हत्रू उपआरोग्य केंद्रात डॉक्टर झोपेत, महिलेची उघड्यावर प्रसुती

## मेलघाटातील आरोग्य व्यवस्थेचा बोजवारा – चौकशीचे आदेश

**विदर्भ केसरी। प्रतिनिधी : प्रेमदास तायडे**

दैनिक विदर्भ केसरी, मेलघाट चिखलदरा तालुक्यातील अतिदुर्गम हत्रू गावात आरोग्य विभागाच्या गलथान कारभाराचा संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. सेमाडोह प्राथमिक आरोग्य केंद्रापासून सुमारे २५ किलोमीटर अंतरावर असलेल्या हत्रू गावात उपआरोग्य केंद्र असून येथे दोन डॉक्टर व एक सिस्टर कर्तव्यावर असताना देखील एका गरोदर महिलेची थंडीत दवाखान्याच्या कॅम्प परिसरात उघड्यावर प्रसूती झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. हत्रू उपआरोग्य केंद्रापासून सुमारे ५ किलोमीटर अंतरावरील खुटीदा गावातील महिला रात्री सुमारे ११ वाजताच्या सुमारास प्रसूती वेदनेने तळमळत होती. गावातील आशा वर्कर सुट्टीवर असल्याने त्यांच्या नातेवाईकांच्या मदतीने शासकीय वाहनातून सदर गरोदर महिलेला उपचारासाठी हत्रू उपआरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. मात्र, रात्री उशिरा डॉक्टर झोपेत असल्याने दवाखान्याचा दरवाजा ठोठावूनही उघडण्यात आला नाही. अखेर कोणताही वैद्यकीय उपचार न मिळाल्याने दवाखान्याच्या कॅम्प परिसरातील खुल्या जागेतच सदर महिलेची प्रसूती झाली. विशेष म्हणजे ही संपूर्ण घटना ॲम्बुलन्स पायलटसमोर घडली असताना देखील येथील डॉक्टर व सिस्टर यांनी महिलेला उपचारासाठी दवाखान्यात आलेच नसल्याचा दावा करत जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न केला. प्रसूतीनंतर रात्रीच्या थंडीत कोणताही उपचार न देता महिलेला पुन्हा वाहनाने खुटीदा गावात परत नेण्यात आले. दुसऱ्या दिवशी ही घटना गावकऱ्यांना समजताच संताप व्यक्त करण्यात आला. सामाजिक कार्यकर्ते भैयालाल मावसकर यांनी उपआरोग्य केंद्रात भेट देऊन डॉक्टरांशी चर्चा केली असता डॉक्टरांनी सदर महिला उपचारासाठी आलीच नसल्याचे सांगितले. दरम्यान, या प्रकरणाची सत्यता जाणून घेण्यासाठी दैनिक विदर्भ केसरीचे प्रतिनिधी प्रेमदास तायडे यांनी चिखलदरा येथे तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांची भेट घेतली. यावेळी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी संबंधित महिलेची प्रसूती उपआरोग्य केंद्राच्या खुल्या जागेतच झाल्याची स्पष्ट कबुली दिली. या गंभीर प्रकरणाची दखल घेत चौकशीचे आदेश देण्यात आले असून दोषींवर कारवाई करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच तालुक्यातील सर्व उपआरोग्य केंद्रांतील डॉक्टर, सिस्टर व कर्मचाऱ्यांना सतर्क राहण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. या घटनेमुळे मेलघाटातील आरोग्य यंत्रणेची दयनीय अवस्था पुन्हा एकदा चव्हाट्यावर आली असून दुर्गम भागातील गरोदर मातांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.



दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू TODAY

चंद्रपूर

GOOD MORNING

## अमरावतीत प्रथमच 12 लाख बक्षिस रकमेची बुद्धिबळ स्पर्धा

विदर्भाच्या बुद्धिबळ इतिहासात प्रथमच अमरावती शहरात १२ लाख विक्रमी पुरस्कार रकमेची अखिल भारतीय फिडे मानांकन बुद्धिबळ स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे. अखिल भारतीय १७०० खालील फिडे मानांकन बुद्धिबळ स्पर्धा २३ ते २५ जानेवारी या कालावधीत शुभम मंगलम, दसरा मैदानासमोर, बडनेरा रोड, अमरावती येथे पार पडणार आहे. या स्पर्धेत उत्साहात बुद्धिबळपटू सहभागी होणार आहेत. तीन दिवस चालणाऱ्या या स्पर्धेत महाराष्ट्रासह देशभरातील नामांकित, उदयोन्मुख तसेच अनरेटेड बुद्धिबळपटू मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. स्पर्धेतील प्रथम पारितोषिक १ लाख ११ हजार रुपयांचे आहे. १५०१ ते १६०० फिडे मानांकन गटासाठी प्रथम बक्षीस ७१००० तसेच १४०१ ते १५०० फिडे मानांकन गटासाठी प्रथम बक्षीस ७१ हजार रु. ठेवण्यात आले आहे. याशिवाय विविध वयोगट, महिला खेळाडू, ज्येष्ठ खेळाडू व विशेष गटांसाठी मिळून एकूण १५१ पेक्षा अधिक आकर्षक बक्षिसांची योजना करण्यात आली असून, सर्व गटांसाठी एकत्रित बक्षीस रक्कम १२ लाख इतकी आहे. ही स्पर्धा फिडे , ऑल इंडिया चेस फेडरेशन , महाराष्ट्र राज्य बुद्धिबळ संघटना व अमरावती चेस असोसिएशन यांच्या मान्यतेने आयोजित करण्यात येत असून, फिडे मानांकनासाठी पात्र आहे. त्यामुळे नवोदित खेळाडूंना आंतरराष्ट्रीय मानांकन मिळवण्याची तसेच विद्यमान फिडे रेटिंग वाढवण्याची सुवर्णसंधी उपलब्ध होणार आहे. खेळाडू व पालकांच्या सोयीसाठी स्पर्धास्थळीच भोजन व निवासाची व्यवस्था करण्यात आली आहे.

## संक्षीप्त



### बोडधा (कुडे) येथे श्रीमद् भागवत ज्ञानयज्ञ भक्ती सत्संग सोहळा उत्साहात संपन्न

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रल्हाद मेश्राम**

देसाईगंज : बोडधा (कुडे), ता. ब्रह्मपुरी, जि. चंद्रपूर येथे समस्त ग्रामवासीयांच्या वतीने आयोजित श्रीमद् भागवत ज्ञानयज्ञ भक्ती सत्संग सोहळा मोठ्या भक्तिभावाने व उत्साहात संपन्न झाला. या पवित्र सोहळ्यास जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष महेंद्र ब्राम्हणवाडे यांनी उपस्थित राहून ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. यावेळी ब्राम्हणवाडे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात भारतीय संस्कृती, अध्यात्म व समाजात सद्भावना निर्माण करण्यासाठी अशा धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. श्रीमद् भागवत कथेमधून मिळणारे जीवनमूल्ये आत्मसात करून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवावे, असे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमास सलीन बदन, रामकृष्ण हुलके, दीपक ठाकरे, अमोल ठाकरे, महेश कोटगले, राजेंद्र राऊत, कैलास ठाकरे, राकेश ठाकरे, दुर्योधन ठाकरे जिल्हा उपाध्यक्ष गडचिरोली अनिल कोठारे, श्रीनिवास ताडपल्लीवार,गौरव येणप्रेड्डीवार, विपुल एलटीवार, कुणाल ताजने व मोठ्या संख्येने ग्रामस्थ, महिला, युवक व भाविक उपस्थित होते.




### आमगाव येथे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रल्हाद मेश्राम**

देसाईगंज : लोकसेवा माध्यमिक विद्यालय, आमगाव (ता. देसाईगंज, जि. गडचिरोली) येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार मा. श्री. रामदासजी मसराम यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणाचे महत्त्व सांगून विद्यार्थ्यांनी जिद्द, मेहनत व शिस्तीच्या जोरावर यश संपादन करावे, असे आवाहन केले. कार्यक्रमास शिक्षकवृंद, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्या प्रसंगी उपस्थित धनपाल मिसार सर, कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून माजी उपसभापती नितीन राऊत, जगदिशजी केळझरकर सर , तितीरमारे सर, सुभाषजी तीतिरमारे, मुख्याध्यापक, लोकसेवा विद्यालय आमगाव निलेश तितीरमारे, दुनेदार सर तुळशी, सदस्या, ग्रा.पं. आमगाव सोनलताई घोरमोडे, हरिदास पेंदाम सर, उईनवार सर, घोरमोडे साहेब, रशिलाताई तीतिरमारे, नलिनीताई तीतिरमारे, कुसुमताई मासुरकर, प्रियांका तीतिरमारे, स्वप्नीलजी भोयर गजाननजी अलोने, उपस्थित होते.

# बाह्यस्थ नेमणुकीच्या नावाखाली मनरेगा कर्मचा-याची पिळवणूक

## शासन - खासगी संगनमता विरोधात 23 जानेवारीपासून राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) अंतर्गत महाराष्ट्र राज्यात कार्यरत असलेल्या हजारो कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांची बाह्यस्थ (आउटसोर्सिंग) नेमणुकीच्या नावाखाली सर्रास आर्थिक, सेवासंबंधी व मानसिक पिळवणूक सुरू असून, शासन याकडे जाणीवपूर्वक डोळेझाक करत आहे, असा गंभीर आरोप मनरेगा कंत्राटी अधिकारी/कर्मचारी संघटनेने केला आहे.

राज्य MIS समन्वयक, तांत्रिक समन्वयक, कार्यक्रम व्यवस्थापक, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी, MIS कर्मचारी, डेटा एंट्री ऑपरेटर, शिपाई आदी पदांवर कार्यरत कर्मचारी मंत्रालयापासून ग्रामपातळीपर्यंत मनरेगा योजनेचा कणा आहेत. त्यांच्या मेहनती मुळेच महाराष्ट्र राज्य मनरेगा अंमलबजावणीत देशात अग्रस्थानी आहे. मात्र याच कर्मचाऱ्यांना खासगी कंपन्यांच्या दावणीला बांधून ठेवून स्वस्त मजुरीवर राबवले जात आहे, ही बाब अत्यंत संतापजनक आहे. संघटनेच्या मते, S-2 Infotech सारख्या बाह्यस्थ कंपन्यांमार्फत चालवली जाणारी भरती प्रक्रिया ही पूर्णतः अनधिकृत, अवैध आणि शोषणकारी असून, या माध्यमातून कर्मचाऱ्यांची सेवा-सुरक्षा हिरावून घेतली जात आहे. "शासनाच्या योजनेत काम, पण खासगी कंपनीच्या ताब्यात भविष्य" ही अवस्था म्हणजे आधुनिक गुलामगिरीचाच प्रकार आहे, असा घणाघात संघटनेने केला आहे. एकीकडे सर्व शिक्षा अभियान, राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) यांसारख्या योजनांतील कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेतले जाते, तर दुसरीकडे मनरेगा कर्मचाऱ्यांना मुद्दाम बाह्यस्थ नेमणुकीत अडकवून ठेवले जात आहे, हा उघड भेदभाव असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. संघटनेच्या ठाम व निर्णायक मागण्या मनरेगा अंतर्गत कार्यरत सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांचे तात्काळ शासन सेवेत नियमितीकरण / समायोजन S-2 Infotech व इतर बाह्यस्थ कंपन्यांमार्फत सुरू असलेली भरती व सेवा-पुरवठा प्रक्रिया तात्काळ रद्द करणे, "समान काम – समान वेतन" धोरण लागू करणे, मनरेगा विभागासाठी स्वतंत्र यंत्रणा व पदनिहाय आकृतीबंध मंजूर करणे, या मागण्यांसाठी शासनास आंदोलन नोटीस व स्मरणपत्र देऊनही कोणतीही दखल न घेतल्यामुळे, दिनांक 23 जानेवारी 2026 पासून संपूर्ण महाराष्ट्रात मनरेगा कंत्राटी कर्मचाऱ्यांचे राज्यव्यापी आंदोलन सुरू होणार आहे. प्रारंभी सर्व कार्यालयांमध्ये काळ्या फिती लावून शांततामय निषेध करण्यात येईल; मात्र शासनाने अजूनही दुर्लक्ष केल्यास आंदोलन अधिक तीव्र व निर्णायक स्वरूपाचे असेल, असा स्पष्ट इशाराही संघटनेने दिला आहे."ही लढाई केवळ वेतनाची नाही, तर सन्मान, सेवा-सुरक्षा आणि शोषणमुक्त भविष्यासाठीची आहे. शासनाने वेळीच निर्णय घेतला नाही तर त्याची जबाबदारी संपूर्णपणे शासनाचीच असेल," असे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी ठामपणे सांगितले.





# विकासाचा खरा पाया ग्रामपंचायत माजी उपसभापती विलास दशमुखे

## नवरगांव ग्रामपंचायत भवनाचे लोकार्पण सोहळा

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : गावाच्या विकासाचा खरा पाया ही ग्रामपंचायत असून या नविन वास्तुमधून जनसामान्यांचे कामे सुरळीत व जलदगतीने व्हावी यासाठी पदाधिकारी व कर्मचारी यांनी प्रयत्न करावे असे प्रतिपादन माजी उपसभापती विलास केशवराव दशमुखे यांनी केले. नवरगांव ग्रामपंचायतच्या नविन प्रशासकीय ईमारतीचे लोकार्पण प्रसंगी ते कार्यक्रमाच्या अध्यक्ष पदावरून बोलत होते. ईमारतीचे लोकार्पण माजी सभापती मारोतराव ईचोडकर यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी संवर्ग विकास अधिकारी अनिकेत पाटील, नवरगांव ग्रामपंचयातीच्या सरपंचा सुनंदा दशमुखे, उपसरपंचा उषा भोयर, विस्तार अधिकारी वि. डी. देवारे, ग्रामपंचायत सदस्य उमाकांत चुधरी, राजेंद्र थोराक, कृष्णाजी जांभुळकर, श्रीमती कविता भैसारे, श्रीमती दिपाली लांबाडे, पेसा समिती अध्यक्ष वसंत चुधरी, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक बापूजी फरांडे, माजी सरपंच दादाजी साळवे, पोलीस पाटील राजहंस जांभुळकर, संतोष दशमुखे, शेगोबा पा. म्हशाखेत्री, दादाजी दशमुखे, तुळशिराम आवारी आदि मान्यवर उपस्थित होते. नवरगांव या गावामध्ये गेल्या दहा वर्षामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये विविध लेखा शिर्षामधून विकास कामे केली असून मुख्य नवरगांव ते चुरचुरा हा रस्ता अजूनही झालेला नाही. तसेच गावातील स्मशानभुमी यासाठी आपण प्रयत्न करणार असून याही रस्त्याचे काम लवकरात लवकर कसे होईल यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे सांगितले. यावेळी संवर्ग विकास अधिकारी अनिकेत पाटील यांनी विविध शासनाच्या योजनांची माहिती दिली. उद्घाघटक मारोतराव ईचोडकर यांनी या गावामध्ये भरपूर विकासकामे झाली असून पंचायत समितीच्या माध्यमातून सुद्धा या ठिकाणी अनेक विकास कामे करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे संचलन व प्रास्ताविक ग्रामपंचायत अधिकारी धनजंय शेंडे यांनी केले. तर आभार गुरुदेव झरकर यांनी मानले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.



# नांदगावात समूहिक हळदी कुंकू कार्यक्रम

## नगराध्यक्ष प्राप्ती मारोटकर यांचे आयोजन : तुळशी रोपटे व तिरंगा झेंडा वाटप करून सामाजिक संदेश

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : अमोल धवसे**



नांदगाव शहरात नगरपंचायत कार्यालयात नगराध्यक्ष सौ प्राप्ती मारोटकर यांनी आयोजन केलेले सामूहिक हळदी कुंकू समारंभ उत्साहात पार पडले सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजनाने हळदी कुंकू कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली यावेळी शहरातील हजारो महिलांची उपस्थिती होती.

संक्रांतीनिमित्त जानेवारी महिन्यात हळदी कुंकू स्त्रियांचा मोठा सण असून मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. हळदी कुंकू हा केवळ धार्मिक किंवा सांस्कृतिक कार्यक्रम नसून तो महिलांच्या सन्मानाचा, एकतेचा आणि आपुलकीचा उत्सव आहे व अशा कार्यक्रमांमुळे महिलांना एकत्र येण्याची संधी मिळते. संवाद वाढतो आणि नातेसंबंध अधिक दृढ होतात असे मत नगराध्यक्ष प्राप्ती मारोटकर यांनी व्यक्त केले. शहरातील महिला आज घर,समाज,शिक्षण,आरोग्य आणि प्रशासन अशा सर्वच क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत असल्याचे मत स्वच्छता व आरोग्य सभापती सौ ज्योत्स्ना धवसे यांनी व्यक्त केले महिलांची ताकद संयम आणि निर्णयक्षमता हेच शहराच्या प्रगतीचे खरे भांडवल असल्याचे मत महिला व बालकल्याण सभापती कांता लोमटे यांनी व्यक्त केले यावेळी मुस्लिम महिलांची सुद्धा लक्षणीय उपस्थिती होती शहरातील हजारो महिलांची उपस्थिती होती यावेळी नगरसेविका सौ प्रांजली गुल्हाने, सौ प्रीती इखार, शीलाताई वाडेकर, आयेशा शेख, रजियाबी अ. सलाम, सौ जयश्री सुहागपुरे माजी उपसभापती सौ. रेखा नागोलकर इत्यादी उपस्थित होते. तिरंगाझेंडाव५००तुळशीरोपट्यांचेवाटप सामूहिक हळदी कुंकू सोहळ्यात वाण देतांना सामाजिक संदेश म्हणून तुळशीचे रोपे व तिरंगा झेंडा व इतर वृक्षाचे वाटप यावेळी वाण देताना केले.

## जिल्ह्यात पुन्हा ढगाळ वातावरण; शेतक-यांची चिंता वाढली

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी**

हवामानाचा लहरीपणा कायम असून, गुरूवारी पुन्हा एकदा ढगाळ वातावरणाने नागरिकांसह शेतकऱ्यांची चिंता वाढवली. सकाळपासूनच वातावरणात मोठा बदल जाणवत होता. आकाशात ढगांची गर्दी झाल्याने सकाळी थंडीचा गारठा अधिक जाणवला. दुपारच्या सुमारास साधारण एक तास सूर्यदर्शन झाले. काही काळ ऊन पडल्याने नागरिकांना दिलासा मिळाला. मात्र दुपारी चार वाजेनंतर पुन्हा ढगांनी आकाश व्यापले आहे. संध्याकाळपर्यंत ढगाळ वातावरण कायम होते. हवामान तज्ज्ञांनी दिलेल्या अंदाजानुसार जिल्ह्यात २६ जानेवारीपर्यंत ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता आहे. या कालावधीत सकाळच्या वेळी धुक्याची दाट शक्यता वर्तवण्यात आली असून, त्याचा परिणाम दैनंदिन जीवनावर होण्याची शक्यता आहे. सध्या पश्चिमेकडून येणारी हवामान प्रणाली सक्रिय झाली आहे. ज्यामुळे सकाळी धुके व हलके ढगाळ वातावरण आहे. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण होऊन पश्चिमेकडून वाहणारे वारे सक्रिय झाले आहेत. तर हिमालयात बर्फवृष्टी होत आहे. उत्तर महाराष्ट्राकडे ही हवा उत्तर-पश्चिम दिशेने येत आहे.

# तेंदूपत्ता खरेदी-विक्री प्रक्रिया २०२६ मध्ये ई-टेंडरिंगद्वारेच राबवावी

## इंदरशाह मडावी यांची ठाम भूमिका



भामरागड : दि. २२ जानेवारी २०२६ तेंदूपत्ता खरेदी-विक्री प्रक्रिया २०२६ साली पूर्णपणे पारदर्शक, कायदेशीर व ग्रामसभा-केंद्रित असावी तसेच ही प्रक्रिया ई-टेंडरिंगद्वारेच राबवण्यात यावी, अशी ठाम भूमिका माजी. समाजकल्याण सभापती, जिल्हा परिषद गडचिरोली मा. इंदरशाह मडावी यांनी मांडली आहे. दि. २२ जानेवारी २०२६ रोजी पंचायत समिती भामरागड येथील पेसा समन्वयक श्री. श्रीकांत नैताम व अर्जुन आलम (रा. केळमारा) यांच्यासोबत झालेल्या सविस्तर चर्चेदरम्यान मा. मडावी यांनी तेंदूपत्ता खरेदी-विक्री प्रक्रियेतील त्रुटींवर लक्ष वेधले. यावेळी त्यांनी सांगितले की, संविधानाच्या ७३ व्या घटनादुरुस्ती तसेच पंचायती (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तार) अधिनियम १९९६ (PESA Act) नुसार अनुसूचित क्षेत्रातील लघुवनोपजांवर प्रथम हक्क ग्रामसभेचा आहे. तेंदूपत्ता हा महत्त्वाचा लघुवनोपज असून त्याच्या खरेदी-विक्री प्रक्रियेत ग्रामसभेची संमती व सक्रिय सहभाग अनिवार्य आहे. तसेच महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८, महाराष्ट्र लघुवनोपज व्यापार व नियमन कायदा आणि शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार तेंदूपत्ता व्यापारात पारदर्शकता राखणे बंधनकारक आहे. ई-टेंडरिंग प्रक्रिया राबविल्यास खुली स्पर्धा निर्माण होऊन ग्रामसभेला योग्य व स्पर्धात्मक दर मिळेल, असे मत मा. मडावी यांनी व्यक्त केले. मध्यस्थ, दलाल किंवा खाजगी हितसंबंध असणाऱ्या व्यक्तींना या प्रक्रियेत कोणतीही संधी देता कामा नये, असे स्पष्ट करत पारंपरिक पद्धतीमुळे आदिवासी संकलकांचे आर्थिक नुकसान होत असल्याचे त्यांनी नमूद केले. या संदर्भात मा. इंदरशाह मडावी, श्री. श्रीकांत नैताम व अर्जुन आलम यांनी संयुक्तपणे संबंधित संवर्ग विकास अधिकाऱ्यांना लेखी निवेदन सादर केले. निवेदनात २०२६ साठी तेंदूपत्ता खरेदी-विक्री प्रक्रिया ई-टेंडरिंग सक्तीची, दलालमुक्त व ग्रामसभा-केंद्रित ठेवण्याची ठोस मागणी करण्यात आली आहे. ही मागणी मान्य झाल्यास तेंदूपत्ता संकलनावर अवलंबून असलेल्या हजारो आदिवासी कुटुंबांना थेट आर्थिक लाभ होईल तसेच शासनाच्या "ग्रामस्वराज्य" व "आदिवासी हक्क" धोरणाला बळ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# सोनापूरच्या सरपंच जया सातपूते प्रजासत्ताक दिनाच्या दिल्लीतील विशेष अतिथी प्रजासत्ताक दिनाच्या सोहळयासाठी विशेष आमंत्रण

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी**

गोंडपिपरी : येत्या 26 जानेवारी रोजी 76 व्या भारतीय प्रजासत्ताक दिनाचा सोहळा दिल्ली येथे संपन्न होणार आहे.या सोहळयासाठी विशेष अतिथी म्हणून राज्यातील सोळा सरपंचांची निवड करण्यात आली आहे.यात चंद्रपूर जिल्हयातील सोनापूर देशपांडे ग्रामपंचायतीच्या सरपंच जया दिपक सातपुते यांना हा सन्मान मिळाला आहे.त्यांना मिळालेल्या या विशेष मानामुळे परिसरात अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

सोनापूर देशपांडे हे चंद्रपूर जिल्हयातील गोंडपिपरी तालुक्यातील तेंलगणा सिमेलगत असलेल छोटस गावं आहे.जया दिपक सातपुते या गावच्या सरपंच आहेत.त्यांनी आपल्या कारकीर्दीत विविध नाविण्यपूर्ण उपक्रम राबविले. गावाचा सर्वांगिंण विकास साधण्याचे उधिष्टये ठेवीत त्यांनी प्रभावी नियोजन केले.हागणदारी गाव अंतर्गत स्वच्छ भारत मिशन मोहिम त्यांनी यशश्वी केली.स्मार्ट ग्राम अभियानात उत्कृष्ट कार्य करित 2019-20 मध्ये या ग्रामपंचायतीने प्रथम कं्रमाक पटकविला.संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाचा तालुकास्तरीय पुरस्कार पटकविला.कें्रद शासनाच्या पेपरलेस अभियानात अतिशय उत्तम कामगिरी करित चंद्रपूर जिल्हयातून पहिली पेपरलेस ग्रामपंचायतीचा मान जया सातपुते यांच्या नेतृत्वात ग्रामपंचायत सोनापूरला मिळाला. गावातील शाळा आदर्श होण्याच्या मार्गावर असून महिला बचत गटांच्या माध्यमातून रोज ग्रामसफाईचे काम गावात केली जातात.सौर उर्जेचा वाफर करित स्वतंत्र पाणीपुरवठा योजना कार्यान्वीत करण्यात आली आहे.याचसोबत ग्रामविकासाचे अनेक कामे जया दिपक सातपुते यांच्या नेतृत्वात करण्यात आली आहेत.त्यांच्या या कार्याने तेलंगणा सिमेवरील या छोटयाशा गावाने संपूर्ण राज्यात आपल्या कामाचा डंका वाजविला आहे.येत्या 26 जानेवारी रोजी दिल्ली येथे 76 वा भारतीय प्रजासत्ताक दिन अतिशय उत्साही वातावरणात संपन्न होणार आहे.या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्यातील फक्त सोळा सरपंचाना विशेष अतिथी म्हणून सन्मान दिला जाणार आहे.यात सोनापूर ग्रामपंचायतीच्या सरपंच जया दिपक सातपुते यांचाही समावेश आहे.जया सातपुते व त्यांचे पती दिपक सातपुते या दोघांनाही या कार्यक्रमाचे निमंत्रण केंद्रातून धाडण्यात आले आहे.एका अतिशय लहानश्या गावातील सरंपचांना त्यांच्या कार्यकुशलतेच्या बळावर हा सन्मान मिळाल्याची बातमी समोर आल्यानंतर त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.



दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू | TODAY

गडचिरोली GOOD MORNING

## पुण्यात कारने 5 वर्षांच्या मुलाला चिरडले:सीसीटीव्हीमध्ये संपूर्ण घटना कैद




पुणे येथील लोणी काळभोरमध्ये शुक्रवारी एका निवासी सोसायटीमध्ये एका कारने सायकल चालवणाऱ्या 5 वर्षांच्या मुलाला चिरडले. या अपघातात मुलाचा मृत्यू झाला. ही संपूर्ण घटना सोसायटीमध्ये लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली. व्हिडिओमध्ये दिसते की मुलगा सायकल चालवत होता, तेव्हा एक कार आली आणि मुलाला चिरडून निघून गेली. कार चालक सोसायटीमध्ये आपल्या मित्राला सोडण्यासाठी आला होता. परत जाताना गेटजवळ हा अपघात झाला. मुलाच्या वडिलांनी निष्काळजीपणा आणि भरधाव वेगाने गाडी चालवल्यामुळे मृत्यू झाल्याचा आरोप करत तक्रार दाखल केली आहे. अपघाताचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. पोलिसांनी सांगितले की ते सीसीटीव्हीची तपासणी करत आहेत. रहिवाशांनी या घटनेवर संताप व्यक्त केला आहे. सोसायटीच्या आत भरधाव वेगाने गाडी चालवण्याची परवानगी कशी दिली गेली, असा प्रश्न लोकांनी विचारला आहे. त्यांनी चालकाविरुद्ध कठोर कारवाईची मागणी केली आहे.

## संक्षिप्त



### सार्वजनिक हनूमान मंदिर सभामंडप व जिर्णोध्दार बांधकामाचे भूमिपूजन

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

कुरखेडा : सार्वजनिक हनूमान मंदिर गांधी वार्ड कूरखेडा येथील सभामंडप व जिर्णोध्दार बांधकामाला नगरपंचायत व सार्वजनिक बांधकाम विभाग यांचा वेगवेगळ्या योजनेतून मंजुरी मिळाली आहे या बांधकामाचे आज भुमिपूजन करीत प्रत्येक्ष बांधकामाला सूरवात करण्यात आली. सभामंडपाकरीता २० लक्ष तर जिर्णोध्दार बांधकामाकरीता १० लक्ष रूपयाचा निधीला मंजूरी मिळाल्याने भाविक भक्ताकरीता मोठी सुविधा निर्माण होणार आहे. बांधकामाचे भूमिपूजन सार्वजनिक हनूमान मंदिर कमेटीचे अध्यक्ष डॉ महेन्द्र कुमार मोहबंसी व भाजपा तालुकाध्यक्ष चांगदेव फाये यांचा हस्ते करण्यात आले याप्रसंगी पंडित अविनाश दूबे महाराज मंदिर कमेटीचे सचिव श्याम लांजेवार माजी नगराध्यक्ष रवींद्र गोटेफोडे, न.प. पाणीपुरवठा सभापती आशीष काळे, मंगेश मांडवे भाजयुमो चे तालुका अध्यक्ष उल्हास देशमुख, नगरसेवक अतूल झोडे चंदू नाकतोडे सार्वजनिक हनूमान मंदिर महिला समीती अध्यक्ष शारदा गाथाडे, नर्मदा डेकाटे, कविता खडसे, वनिता थोटे, ज्योती उईके, आशिष चूधरी, दूर्गेश मेश्राम, हेमराज मारबते,दूर्गेश देशमुख, रोहीत निपाने, सचिन दूमाने तसेच भाविक मंडळी हजर होते.





### देसाईगंज येथे महर्षी मार्कंडेय जन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रल्हाद मेश्राम**

देसाईगंज : देसाईगंज येथील राजेंद्र वॉर्डमधील समाज भवनात महर्षी मार्कंडेय जन्मोत्सव सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास आमदार श्री. रामदासजी मसराम यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली यावेळी आमदार श्री. मसराम यांनी महर्षी मार्कंडेय यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत समाजाने त्यांच्या विचारांपासून प्रेरणा घ्यावी, असे आवाहन केले. कार्यक्रमाप्रसंगी मंडळाच्या वतीने आमदार श्री. रामदासजी मसराम यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. या प्रसंगी धनपाल मिसार सर, प्रमोद चिलवे, नगरसेवक विकास प्रधान, नगरसेविका राधिका पत्रे, राधेश्याम पत्रे, सागर वाढई, प्रशांत अंकमवार , शैलेश येलगंदवार, स्वप्निल मिसार, गौरव शिलार, तसेच समाजातील मान्यवर, पदाधिकारी, युवक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन समाज बांधवांच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी आयोजकांनी विशेष परिश्रम घेतले.




### कान्होली येथे श्रीमद् भागवत सप्ताह संपन्न

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रल्हाद मेश्राम**

देसाईगंज : चामोर्शी तालुक्यातील कान्होली येथे वारकरी संप्रदाय तथा बहुउद्देशीय विकास संस्था, कान्होली व समस्त गावकरी मंडळी यांच्या संयुक्त विद्यमाने गावात धार्मिक व आध्यात्मिक वातावरण निर्माण व्हावे, समाजात सद्भावना, नैतिकता व संस्कार रुजावेत या उदात्त हेतूने श्रीमद् भागवत सप्ताह, श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण तसेच प्रवचन व हरिकीर्तन सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले होते. या पवित्र श्रीमद् भागवत सप्ताह प्रसंगी गडचिरोली जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष महेंद्रभाऊ ब्राम्हणवाडे, अध्यक्ष यांनी उपस्थित राहून उपस्थित भाविकांना मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी श्रीमद् भागवत ग्रंथाचे धार्मिक, सामाजिक व मानवी जीवनातील महत्व सविस्तरपणे विशद करताना, भक्ती, सेवा, सदाचार आणि मानवतेचा संदेश समाजाने आचरणात आणावा असे आवाहन केले. भागवत व ज्ञानेश्वरीतील विचार आजच्या धकाधकीच्या जीवनात मार्गदर्शक ठरतात, असे मत त्यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमास चामोर्शी तालुका काँग्रेस अध्यक्ष प्रमोदभाऊ भगत, जिल्हा उपाध्यक्ष अनिलभाऊ कोठारे, पर्यावरण विभाग अध्यक्ष राजेशजी ठाकूर, माजी सरपंच दिवाकर पा. निसार, विजयभाऊ लाड, लालाजी सातपुते, दिगंबरभाऊ धानोरकर, प्रफुल बारासागडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच मोठ्या संख्येने भक्तगण, वारकरी, महिला, युवक व ग्रामस्थांनी या सोहळ्याला उपस्थिती लावून धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घेतला.

# कुरखेडा तालुक्यातील ‘नान्ही’ येथील अवैध वाळूसाठाप्रकरणी ‘तारामंगल’ला १.४६ कोटींचा दंड

## जिल्हाधिकाऱ्यांचा वाळूतस्करांना दणका : ७८६ ब्रास अवैध वाळूसाठा प्रकरणी महसूल विभागाने अखेर कडक पाऊल

**विदर्भ केसरीच्या बातमीचा परिणाम**

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**



गडचिरोली : कुरखेडा तालुक्यातील नान्ही येथे उघडकीस आलेल्या ७८६ ब्रास अवैध वाळूसाठा प्रकरणी महसूल विभागाने अखेर कडक पाऊल उचलले आहे. तीन आयएएस अधिकाऱ्यांच्या उच्चस्तरीय समितीने केलेल्या सखोल चौकशीनंतर, कुरखेडा तहसीलदारांनी ‘तारामंगल एजन्सी’ला १ कोटी ४६ लाख १९ हजार ६०० रुपयांचा दंड आकारून दणका दिला आहे. ‘लोकसत्ता’ने हे प्रकरण समोर आणल्यानंतर जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी चौकशीचे आदेश दिले होते. या कारवाईमुळे वाळू तस्करांचे धाबे दणाणले आहेत. नान्ही येथील सर्वे क्रमांक १२७ मध्ये मोठ्या प्रमाणात वाळूचा उपसा करून अनधिकृतपणे साठा करण्यात येत असल्याचे माध्यमांनी उघड केले होते. यावरून शहानिशा करण्यासाठी मंडळ अधिकारी आणि ग्राम महसूल अधिकारी यांनी प्रत्यक्ष स्थळावर जाऊन मोजणी केली असता, तिथे ७८६ ब्रास वाळूचा साठा विनापरवाना आढळला. या साठ्याबाबत कोणतीही अधिकृत परवानगी नसल्याचे प्राथमिक तपासातच स्पष्ट झाले होते. यानंतर तीन आयएएस अधिकाऱ्यांच्या उच्चस्तरीय समितीने केलेल्या सखोल चौकशीतदेखील वाळू साठा अवैध असल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी तारामंगल एजन्सीचे प्रोप्राईटर शंभू राजकुमार अग्रवाल (रा. देवरी, जि. गोंदिया) यांना तहसील कार्यालयामार्फत वारंवार नोटिसा बजावून बाजू मांडण्याची संधी देण्यात आली होती. मात्र, २१ जानेवारी रोजी पार पडलेल्या अंतिम सुनावणीतही त्यांना या साठ्याबाबत कोणतीही वैध कागदपत्रे किंवा समाधानकारक पुरावे सादर करता आले नाहीत. अखेर प्रशासनाने महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या तरतुदीनुसार दंडात्मक कारवाईचा बडगा उगारला.

**पाचपट दंडाचा दणका**

- महसूल विभागाने केलेल्या दंड आकारणीनुसार, ३ हजार ६०० रुपये प्रति ब्रास बाजारमूल्य असलेल्या वाळूवार वर पाचपट दंड (१८ हजार रुपये) आणि ६०० रुपये रॉयल्टी असा एकूण १८ हजार ६०० रुपये प्रति ब्रासप्रमाणे दंड आकारण्यात आला आहे. एकूण ७८६ ब्रास साठ्यासाठी १ कोटी ४६ लाख १९ हजार ६०० रुपयांची ही दंडात्मक रक्कम निश्चित करण्यात आली असून, ती सरकारी तिजोरीत जमा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या कारवाईमुळे कुरखेडा परिसरातील वाळूमाफियांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

## दारूच्या व्यसनामुळे संसार उद्ध्वस, पोर्ला गावातील खळबळ जणक प्रकार

**दारूसाठी पैसे न दिल्याने पत्नीला पेट्रोल ओतून पत्नीला जिवंत जाळल, एका महिन्यानंतर मृत्यू ; प्रेमविवाह ते निर्दयी हत्या दोन मुलं अनाथ**

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : गडचिरोली जिल्ह्यातील पोर्ला गावात पतीने आपल्या पत्नीला जिवंत जाळून तिची निर्दयीपणे हत्या केल्याची बातमी समोर आली आहे. पत्नीने दारूसाठी पैसे न दिल्याच्या रागात पतीने तिच्यावर पेट्रोल ओतून तिला जिवंत जाळल्याचं वृत्त आहे. पीडित महिलेवर जवळपास एक महिन्यापासून उपचार सुरू होते, पण शेवटी नागपूर रुग्णालयात उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. तसेच, पीडितेचा आरोपी पतीसोबत प्रेमविवाह झाला होता. मिळालेल्या माहितीनुसार, मृत महिलेचं नाव प्रियंका सुशील बारसागडे असून 2018 मध्ये तिने कुटुंबियांच्या विरोधात जाऊन सुशीलसोबत प्रेमविवाह केला होता. सुशील मजूरी करून आपलं घर चालवत होता. लग्नानंतर काही वर्षे दोघांचा सुखाचा संसार सुरू होता.पण, दारूच्या व्यसनामुळे त्यांचा सुखी संसार उद्ध्वस्त झाला. सुशील दारूसाठी सतत प्रियंकाकडे पैसे मागायचा आणि दारूच्या नशेत तिला मारहाण देखील करायचा. 16 डिसेंबर 2025 रोजी सकाळी जवळपास 5 वाजताच्या सुमारास सुशीलने दारूसाठी आपल्या पत्नीकडे पैशांची मागणी केली.प्रियंकाने पैसे देण्यासाठी नकार दिला. त्यानंतर आरोपी पतीने तिला बेदम मारहाण केली आणि कपाटातून 2000 रुपये घेऊन तो घरातून निघून गेला. काही वेळानंतर,तो पुन्हा घरी परत आला. त्यावेळी प्रियंका स्वयंपाकघरात काम करत असताना त्याने



मागून तिच्यावर पेट्रोल ओतलं आणि आग लावली. प्रियांकाच्या ओरडण्याचा आवाज ऐकून तिची 5 वर्षांची मुलगी सुप्रिया सुद्धा जोरजोरात रडू लागली आणि शेजारचे लोक घटनास्थळी धावले. तोपर्यंत प्रियांकाचं शरीर 40 ते 50 टक्के भाजलं होतं. दरम्यान, आरोपी पतीने पकडलं जाऊ नये म्हणून चादरीने आग विझवण्याचं नाटक केलं. या घटनेत गंभीररित्या जखमी झालेल्या प्रियंकाला तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल केलं आण त्यानंतर तिला नागपूरच्या सरकारी मेडिकल कॉलेजमध्ये रेफर केलं. 20 जानेवारी रोजी तिची प्रकृती खालावल्यामुळे उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. पीडितेच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीच्या आधारे, गडचिरोली पोलिसांनी आरोपी सुशील चिंटूजी बारसागडे याच्याविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. या धक्कादायक घटनेमुळे दोन निष्पाप मुलांवरून आईचं छत्र हरपलं. परिसरात या घटनेने एकच खळबळ उडाली आहे.

## गोंडवाना विद्यापीठ परिसरात अल्पवयीन मुलांना तंबाखूजन्य तंबाखूजन्य पदार्थांची विक्री..!

**कोटगल येथील चार पानठेला चालकांवर गुन्हा दाखल करून तंबाखूजन्य पदार्थ जप्त..!**

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**




गडचिरोली : गोंडवाना विद्यापीठ परिसरात अल्पवयीन मुलांना तंबाखूजन्य पदार्थांची विक्री होत असल्याची बाब समोर आल्यानंतर गडचिरोली पोलिसांनी मंगळवारी धडक कारवाई केली. या कारवाईत चार पानठेला चालकांवर गुन्हा दाखल करून तंबाखूजन्य पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. विद्यापीठ परिसरासह आजूबाजूच्या भागात 18 वर्षांखालील मुलांना गुटखा, खर्रा व अन्य तंबाखूजन्य पदार्थ खुलेआम विकले जात असल्याच्या तक्रारी पोलिसांना प्राप्त झाल्या होत्या. त्यानुसार पोलिस निरीक्षक विनोद चव्हाण,पोलिस उपनिरीक्षक भास्कर ठाकरे व त्यांच्या पथकाने २० जानेवारी रोजी परिसरात गस्त व तपासणी मोहीम राबवली. दुपारी 3.30 वा.च्या सुमारास कोटगल चौक, युनिव्हर्सिटी रोड परिसरातील पानठेल्यांवर तपासणी करण्यात आली. या तपासणीदरम्यान चार पानठेला चालक अल्पवयीन मुलांना तंबाखूजन्य खर्रा विक्री करत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. पोलिसांनी दोन पंचांच्या उपस्थितीत चारही पानठेल्यांची झडती घेतली असता प्रत्येकी 40 रुपये किमतीचा एक खर्रा जप्त करण्यात आला.

या प्रकरणी पानठेला चालक श्रीनिवास रजित पाल वय,23 वर्ष,सुधाकर कसुदेव दुधबाठी वय,51 वर्ष, मुखरु कवटू रेगडवार वय,44 वर्ष आणि नीलेश उमाजी दहागावकर वय,34 वर्ष सर्व राहणार कोटगल,यांच्याविरुद्ध सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने अधिनियम २००३ मधील कलम ६ व २४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शैक्षणिक परिसरात व अल्पवयीन मुलांना तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणाऱ्यांवर यापुढेही कठोर कारवाई करण्यात येईल असा इशारा गडचिरोली पोलिसांनी दिला आहे. या कारवाईमुळे अल्पवयीनांना खर्रा विकणाऱ्या पानठेला चालकांना चांगलाच दणका बसला असून, परिसरात खळबळ उडाली आहे.

## पुण्यात घर, दुकानफोडीच्या घटनांत झाली वाढ

पुणे शहरात घरफोडी आणि दुकानफोडीच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. सोमवार पेठ, कात्रज-आंबेगाव, विश्रांतवाडी आणि खराडी यांसारख्या गजबजलेल्या भागांत चोरट्यांनी दिवसा आणि रात्रीही धुमाकूळ घातला आहे. यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सोमवार पेठेतील खडीचे मैदान परिसरातील एका सोसायटीत भरदिवसा घरफोडी झाली. मंगळवारी सकाळी सव्वा अकरा वाजता तक्रारदार महिला घर बंद करून बाहेर पडल्या होत्या. दुपारी पावणेतीन वाजता त्या परतल्यानंतर त्यांना कुलूप तोडलेले आढळले.

## नाटक हे समाज परिवर्तनाचे माध्यम : माजी आमदार कृष्ण गजबे

**शहरातील कार्य कूशल व्यक्तीमत्वांचा सत्कार ; महाराणा गणेश उत्सव मंडळाचा पुढाकार**

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

कुरखेडा : नाटक हे समाज परिवर्तनाचे माध्यम असून नाट्यकलाकृतीच्या माध्यमातून कलावंत वेगवेगळ्या भूमिका साकार करून त्या भूमिकेच्या माध्यमातून समाज जागृत करण्याचे काम करत असतात असे प्रतिपादन माजी आमदार कृष्णा गजबे यांनी केले. यावेळी- शहरात आयोजीत सांस्कृतिक कार्यक्रमाचे निमित्त साधत महाराणा गणेश उत्सव मंडळाचा वतीने शहरातील विविध क्षेत्रात आपल्या कार्य कूशलतेने छाप पाडणार्या व्यक्तीमत्वांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देत सत्कार करण्यात आला. सांस्कृतिक कार्यक्रमाचे उदघाटन माजी आमदार क्रिष्णा गजबे यांचा हस्ते करण्यात आले यावेळी अध्यक्षस्थानी भाजपा तालुका अध्यक्ष चांगदेव फाये होते तर प्रमुख अतिथी म्हणून माजी नगराध्यक्ष रवींद्र गोटेफोडे उद्धवसेनेचे तालुका प्रमुख तथा पाणीपुरवठा सभापती आशीष काळे वनपरिक्षेत्र अधिकारी कैलाश धोंडणे शिंदेसेनेचे तालुका प्रमुख अनिकेत आकरे, लालचंद धाबेकर, डॉ.जगदिश बोरकर, डॉ मयुर नाकाडे, नगरसेवक अतूल झोडे, भाजयुमोचे तालुका अध्यक्ष उल्हास देशमुख, इंजि. तूषार कूथे, लक्ष्मन धूळसे,सूशिल बेहार,आसिफ शेख, नगरसेवक अशोक कंगाले, वनक्षेत्र साहायक संजय कंकलवार, भाजपा महिला जिल्हा उपाध्यक्ष रूपाली कावळे, कल्पना मांडवे, चित्रा गजभिये,आदि उपस्थित होते. यावेळी विधी तसेच सामाजिक व राजकीय क्षेत्रात कार्यरत नगरसेवक ॲड उमेश वालदे, पत्रकारीतेच्या क्षेत्रात कार्यरत सिराज पठान युवा होतकरू कंत्राटदार इंजि.शुभम गोटेफोडे,युवा मराठी उद्योजक रेशम तोंडरे व लोकेश लांजेवार तसेच शासकीय आदिवासी वस्तीगृहाचे उपक्रमशील गृहपाल सदाशिव नरताम यांचा मंडळाचा वतीने शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देत सत्कार करण्यात आला कार्यक्रमाचा यशस्वीते करीता मंडळाचे सागर निरंकारी, मंगेश मांडवे, जगदिश कूमरे, धिरज गणविर, रोशन कूंभलवार, निलेश चंदनखेडे,राज नागापूरे, कुंदन देशमुख, विशाल शिंदिमेश्राम, सोमेश्वर पेंदाम, श्याम विखे, संकल्प राऊत, विकी अरगेलवार, हरिश पिल्लेवान,सुमित माकडे, अस्सू शेख, रूपेश राऊत, कुणाल लांजेवार, प्रमोद कोटांगले , उद्धव आठवले, नामदेव कवडो,गोलू घरडे, स्वप्नील खोब्रागडे यांनी प्रयत्न केले.








# पाहिजेत

'दैनिक विदर्भ केसरी' या अग्रगण्य मराठी वृत्तपत्राचा विस्तार संपूर्ण विदर्भात होत आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ बळकट करण्यासाठी आणि जनसामान्यांचे प्रश्न मांडण्यासाठी आम्हाला विदर्भातील प्रत्येक जिल्हा आणि तालुका पातळीवर उत्साही, कल्पक आणि अनुभवी 'बातमीदार/प्रतिनिधी' नियुक्त करणे आहे.

## खालील सर्व जिल्हे आणि त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या प्रत्येक तालुक्यासाठी प्रत्येकी १ प्रतिनिधीची नियुक्त करणे आहे

### नागपूर
जिल्हा प्रतिनिधी
- नागपूर शहर,
- काटोल, नरखेड,
- सावनेर, रामटेक,
- हिंगणा, उमरेड इ.


### अमरावती
जिल्हा प्रतिनिधी
- अमरावती शहर, अंजनगाव सुर्जी,
- चांदूर बाजार, मोर्शी
- धामणगाव रेल्वे, चांदूर रेल्वे,
- मोर्शी, तिवसा, वरूड, इतर

### अकोला
जिल्हा प्रतिनिधी
- अकोला शहर, अकोट,
- बाळापूर, पातूर,
- तेल्हारा, इ.

### यवतमाळ
जिल्हा प्रतिनिधी
- यवतमाळ शहर दिग्रस,
- दारव्हा,वणी,
- पांढरकवडा, आर्णी इ.

### बुलढाणा
जिल्हा प्रतिनिधी
- बुलढाणा, चिखली,
- खामगाव, शेगाव,
- मलकापूर, देऊळगाव
- राजा इ.

### चंद्रपूर
- चंद्रपूर शहर,
- बल्लारपूर,
- वरोरा, भद्रावती,
- राजुरा, ब्रह्मपुरी



### आकर्षक वेतन
संगणक चालक
पेज डिझायनर.
- कोरल
- फोटोशॉप
- इनडिजाईन
- क्वॉर्क
- ज्ञान आवश्यक

- वर्धा जिल्हा वर्धा शहर, हिंगणघाट, आर्वी, देवळी, सेलू, कारंजा इ.
- गोंदिया गोंदिया, तिरोडा, अर्जुनी मोरगाव, देवरी, आमगाव इ.
- भंडारा भंडारा, तुमसर, पवनी, साकोली, लाखांदूर इ.
- गडचिरोली जिल्हा प्रतिनिधी गडचिरोली, अहेरी, चामोर्शी, देसाईगंज (वडसा), एटापल्ली इ.
- वाशिम शहर कारंजा लाड, रिसोड, मालेगाव, मानोरा.

वरील तालुका जिल्हा प्रतिनिधीसाठी इच्छुक असणाऱ्यांनी आपला बायोडाटा (Biodata) आणि आधार कार्डची प्रत खालील व्हॉट्सअॅप नंबरवर पाठवावी किंवा संपर्क साधावा.

**कुणाल गायकवाड (जिल्हा प्रतिनिधी) मो.9579367474**
**अमोल कंटाळे (संपादक ) मो 9975532291**